




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १४० * नांदेड * बुधवार, दि. २७ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# राज्यात इंधनाची ५२ टक्के अधिक खरेदी; साठेबाजी करणाऱ्यांवर कारवाई करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कडक निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात अफवांमुळे इंधन खरेदी ५२ टक्के अधिक वाढली आहे. ही खरेदी नेमकी कोण करतंय आणि यामध्ये कोण साठेबाजी करतंय, याचा तत्काळ शोध घेऊन पुरवठा व गृहविभागाने कारवाई करावी असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.



राज्यात सध्या सुरू असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या आणि इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी विरोधकांच्या आंदोलनाचा खरपूस समाचार घेतला, तसेच राज्यातील इंधन पुरवठ्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत.

राज्यात सध्या सुरू असलेल्या इंधन खरेदीच्या गोंधळावर आणि वाढत्या मागणीवर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पेट्रोल आणि डिझेलची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यात कुठेतरी साठेबाजी होत आहे, असे देखील निदर्शनास येत आहे. त्यासंदर्भात पुरवठा आणि गृह विभाग आता कारवाई करतील. पेट्रोल संदर्भात जो काही सरासरी वापर आहे त्यापेक्षा २३ टक्के जास्त मागणी वाढली आहे. डिझेलच्या संदर्भात ही मागणी ५२ टक्क्यांनी वाढली आहे. काही ठिकाणी तर ७० टक्के जास्त पुरवठा झाला आहे. त्यामुळे साठेबाजी थांबवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

### राज्यातील शाळा आठवड्यातून फक्त ३ दिवस सुरु ठेवण्याची मागणी

राज्यातील वाढत्या इंधन दरवाढीमुळे स्कूल बस मालकांवर मोठे संकट ओढावले आहे. पुढील महिन्यात राज्यभरात शाळा सुरु होणार आहेत. मात्र, पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढल्याने त्याच दरात स्कुल बसची सेवा पुरवणे आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही. त्यामुळे एकाच सत्रात शाळा सुरु ठेवाव्यात, अशी मागणी स्कुल बस संघटनेकडून करण्यात आली आहे. आठवड्यातून तीन दिवसच शाळा भरवा आणि दोन दिवस ऑनलाइन वर्ग सुरू ठेवा, असे स्कुल बस संघटनेचे म्हणणे आहे.

# हितेंद्र ठाकूरांची बहुजन विकास आघाडी शिवसेनेत विलीन होण्याची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभुमीवर ठाणे विधान परिषदेतून बहुजन विकास आघाडीचे नेते क्षितीज ठाकूर यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. रवींद्र फाटक यांच्या जागी उमेदवार म्हणून बविआचे क्षितीज ठाकूर यांची एन्ट्री होण्याची शक्यता आहे. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकूर पिता–पुत्रांना प्रस्ताव दिल्याची सूत्रांची माहिती आहे. बहुजन विकास आघाडीला शिवसेनेत विलीन करण्याचा एकनाथ शिंदेंनी प्रस्तावही देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.

मतांची गोळाबेरीज वाढविण्यासाठी शिवसेनेची ही खेळी सुरु आहे. त्यामुळे हितेंद्र ठाकूरांची बविआ शिवसेनेत विलीन होणार की नाही?, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. काही दिवसांआधी प्रहार जनशक्ती पक्ष शिवसेनेत विलीन झाला होता. याबदल्यात प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा बच्चू कडू यांना शिवसेनेकडून विधान परिषदेची उमेदवारी देण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच राज्यात न झाल्याने या मतदारसंघामध्ये पूर्वी निवडून आलेल्या आमदारांचा कार्यकाळ संपुष्टात येऊनही निवडणूक होऊ शकली नाही. अशात, गेल्या दोन–अडीच वर्षांपासून आमदारकीच्या जागा रिक्त आहेत.

# न्यायालयाचे 'एनटीए'वर ताशेरे; २०२४च्या पेपरफुटीपासून काहीच धडे न घेतल्याची टिप्पणी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली 'नीट–यूजी' २०२६ परीक्षा प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे रद्द करावी लागल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी संताप व्यक्त केला. तसेच दोन वर्षांपूर्वी झालेल्या पेपरफुटीनंतर सर्वोच्च न्यायालयाने २०२४ मध्ये जारी केलेल्या निर्देशांपासून राष्ट्रीय तपास संस्थेने (एनटीए) कोणतेच धडे घेतले नाहीत, अशी मौखिक टिप्पणीही न्यायालयाने केली.



'एनटीए' बरखास्त करून त्याऐवजी वैद्यकीय प्रवेश परीक्षा घेण्यासाठी एक मजबूत आणि स्वायत्त संस्था स्थापन करावी, अशी मागणी करणाऱ्या अनेक याचिका 'फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन' ही संघटना, डॉक्टर आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्या आहेत. त्यावर सोमवारी न्या. पी. एस. नरसिंह आणि न्या. आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावर न्यायालयाने केंद्र सरकार, 'एनटीए' आणि सीबीआयला नोटीस बजावली. याबरोबरच न्यायालयाने सर्व याचिकांच्या प्रती महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांना देण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्यांची बाजू तन्वी दुबे आणि डॉ. चारू माथूर यांनी मांडली. या याचिकांमध्ये 'एनटीए' बरखास्त करणे, संसदेने कायद्याच्या माध्यमातून निश्चित कायदेशीर अधिकार असलेल्या वैधानिक एनटीएची निर्मिती करणे, पारदर्शकतेचे नियम आणि थेट उत्तरदायित्व अशा विविध मागण्या केल्या गेल्या आहेत.

२०२४च्या पेपरफुटीनंतर, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थापित केलेल्या उच्चाधिकार समितीने केलेल्या शिफारशीनुसार कोणती पावले उचलली आहेत, यासंबंधी 'एनटीए'ने एक स्थिती अहवाल सादर करावा, असे निर्देश खंडपीठाने दिले. इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली ही उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली होती. मात्र, त्या वेळी केंद्र सरकारने नीट–यूजी परीक्षा रद्द केली नव्हती. याबरोबरच उच्चाधिकार समितीने केलेल्या शिफारशींचे पालन होईल याची खबरदारी घेण्यासाठी कोणती पावले उचलली त्याची माहिती देणारे प्रतिज्ञापत्र तीन दिवसांमध्ये सादर करण्याचेही निर्देश न्यायालयाने त्या समितीचे अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांना दिले. पुढील सुनावणी शुक्रवारी होणार आहे.

# विधानपरिषदेच्या १२ जागांसाठी ४८ जणांची नावे

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण अमित शाहांच्या भेटीला दिल्लीत

**मुंबई (प्रतिनिधी)–** भाजपने १२ जागांसाठी तयारी सुरू केली असून उमेदवारांच्या नावांची यादीही निश्चित करण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळेच, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण मंगळवारी ४८ नावांची यादी घेऊन दिल्लीला रवाना झाले आहेत.

राज्यातील विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुकांची घोषणा झाली असून उमेदवारी अर्ज भरण्यासही सुरुवात झाली आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असाच सामना याही निवडणुकीत होत आहे. त्यासाठी, महायुतीमध्ये १२–५–२ असा फॉर्म्युला ठरल्याची चर्चा आहे. त्यामध्ये, भाजप १२, शिंदेंची शिवसेना ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला १ जागा देण्यात येणार असल्याचे समजते. यासंदर्भात अंतिम निर्णय झाला नसून तिन्ही पक्षाचे प्रमुख एकत्र बैठक घेऊन जागावाटप अंतिम करणार आहेत.

विधान परिषदेच्या उमेदवार निश्चितीसाठी भाजपात हालचालींना वेग आला असून पुढील २ ते ३ दिवसांत उमेदवारांची नावे निश्चित केली जाणार आहेत. त्यासाठी, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण दिल्लीला रवाना झाले आहेत. विधान परिषदेच्या एकूण १२ जागांसाठी ४८ जणांच्या नावांची यादी घेऊन चव्हाण दिल्लीत दाखल होत आहेत. दिल्ली दौऱ्यात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांची भेट घेऊन रविंद्र चव्हाण नावांसंदर्भात चर्चा करणार आहेत.

विधानपरिषद निवडणुकांचा महायुतीमधील फॉर्म्युला, भाजपच्या उमेदवारांची नावे व इतर बाबींची तपशीलवार माहिती केंद्रीय पक्ष नेतृत्वाला दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, चव्हाण यांच्या दिल्ली दौऱ्यातच भाजपच्या १२ उमेदवरांची नावे निश्चित केली जाणार असून पुढील २ ते ३ दिवसांत भाजप उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. कारण, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी १ जून पर्यंतची मुदत आहे. त्यामुळे, २–३ दिवसांत नावे निश्चित करुन उमेदवारांना तयारीला लागण्याचे आदेशही पक्षाकडून दिले जातील.

विधानपरिषद निवडणुकांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या प्रमुख नेत्यांशी एकनाथ शिंदेंची अनेकदा चर्चा झाली. विशेष म्हणजे, एकनाथ शिंदे यांनी दिल्ली वारी करूनही विधान परिषदेच्या निवडणुकीवर तोडगा निघत नसल्याचं चित्र दिसून आलं.

# पक्षाची बदनामी थांबवा, ठामपणे भूमिका मांडा!, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचना

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची मंगळवारी सायंकाळी बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाची बदनामी करणाऱ्यांना सडेतोड उत्तर द्या. पक्षाची बदनामी थांबवण्यासाठी वरिष्ठ नेत्यांनी ठामपणे आपली भूमिका मांडावी. पक्षात कोणतीही फूट पडणार नाही, पक्ष एकसंध आहे, असा संदेश लोकांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी वरिष्ठ नेत्यांना दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार, मंत्री आणि पदाधिकारी यांची बैठक मंगळवारी सायंकाळी पार पडली. पक्षात फूट पडणार असल्याचा रोहित पवार यांचा आरोप आणि ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या पदावरून निर्माण झालेल्या संभ्रमानंतर झालेली ही पक्षाची पहिलीच बैठक होती.

बैठकीच्या सुरुवातीलाच सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या पदाविषयी निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत सुनेत्रा पवार यांनी सारवासारव केली. पक्षात ज्येष्ठ नेत्यांचा योग्य सन्मान केला जाईल, असेही त्या म्हणाल्या.




**नांदेड :** इंधन दरवाढ व इंधन टंचाईच्या निषेधार्थ महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेस ओबीसी सेलच प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफार, प्रदेश सरचिटणीस डॉ. रेखा चव्हाण, नगरसेवक सत्यपाल सावंत, ज्योती कदम, दीपसिंघ हजुरिया, देशमुख, आंबेगावकर, संजय वाघमारे, गजानन सरोदे, अंबादास रातोळे, कुमार कुर्तडीकर, श्याम पाटील, अभिलाश पावडे, गोविंद पाटील, गौतम शिरसाठ आदी दिसत आहेत. (छाया : नरेंद्र गडप्पा)

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना मुदतवाढ

**मुंबई (प्रतिनिधी)–** देशात सुरू असलेल्या जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यास झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मंत्रिमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आता शासनाला ३० जून २०२६ पर्यंत बदली प्रक्रिया राबविता येणार आहे. यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. त्याबाबतच्या मसुद्यासह मंजुरी देण्यात आली.






# शस्त्रसंधीचे उल्लंघन, प्रत्युत्तर देण्यास मागेपुढे पाहणार नाही

## हल्ल्यानंतर इराणचा अमेरिकेला थेट इशारा

**तेहरान (वृत्तसंस्था)–** अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ असलेल्या होर्मोझगान प्रांतात मंगळवारी पहाटेच्या सुमारास हल्ला केला. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने या हल्ल्याचा निषेध करत अमेरिकेने शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्याचा आरोप केला. इराणने या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे. दोन्ही देशांत शांतता चर्चा सुरु असून, ती योग्य दिशेने पुढे जात असल्याची माहिती समोर येत असताना हा हल्ला झाल्याने इराणने आक्रमक भूमिका घेतली आहे.

आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांनी दिलेल्या वृत्तानुसार, अमेरिकेच्या लष्कराने मंगळवारी पहाटे दक्षिण इराणमध्ये हल्ला केला. या हल्ल्यात सुरुंग पेरण्याचा प्रयत्न करणाऱ्या बोटी आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण स्थळांना लक्ष्य करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. ही बचावात्मक कारवाई असल्याचे स्पष्टीकरण अमेरिकेने दिले आहे. दरम्यान, या हल्ल्यामुळे इराण आक्रमक झाले असून, तेहरान या हल्ल्याला प्रत्युत्तर देईल व स्वतःचा बचाव करण्यास मागेपुढे पाहणार नाही, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.




**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
**केशव घोणसे पाटील**


# भारतासाठी धोक्याचा नवा इशारा

भारताचा प्रिय शत्रू बांगलादेश याने तिस्ता नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी चीनकडे अधिकृत मदत मागितल्याने दक्षिण आशियातील भू-राजकारण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. हा विषय केवळ नदी व्यवस्थापन किंवा सिंचनापुरता मर्यादित नसून भारताच्या सामरिक, राजकीय आणि कूटनीतिक हितांशी थेट संबंधित आहे. विशेषतः भारताच्या पूर्व आणि ईशान्य भागाच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा घडामोडींचा गंभीर इशारा मानला जात आहे. तिस्ता नदीचा प्रश्न हा भारत आणि बांगलादेश यांच्यात अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. २०११ मध्ये दोन्ही देशांमध्ये पाणीवाटप कराराचा मसुदा तयार झाला होता. मात्र पश्चिम बंगाल सरकारच्या विरोधामुळे तो करार आजपर्यंत अंमलात येऊ शकलेला नाही. परिणामी, बांगलादेशात भारताबद्दल नाराजी निर्माण झाली. भारताकडून सातत्याने आश्वासने मिळत असली तरी प्रत्यक्षात प्रश्न सुटत नसल्याची भावना तेथे बळावत गेली. याच असंतोषाचा फायदा चीनने घेतल्याचे स्पष्ट दिसते. बांगलादेशचा विचार केला तर त्यांच्यासाठी तिस्ता नदी अत्यंत महत्त्वाची आहे. लाखो शेतकऱ्यांचे जीवन, सिंचन व्यवस्था, पूर नियंत्रण आणि उन्हाळ्यातील पाणीटंचाई हे सर्व या नदीवर अवलंबून आहे. त्यामुळे बांगलादेश सरकारला तातडीने उपाययोजना करणे आवश्यक वाटते. चीनकडे आर्थिक ताकद, मोठ्या पायाभूत सुविधा उभारण्याचा अनुभव आणि तत्काळ कर्ज उपलब्ध करून देण्याची क्षमता आहे. त्यामुळे ढाक्याने बीजिंगकडे वळणे हे त्यांच्या दृष्टीने व्यवहार्य पाऊल मानले जात आहे. परंतु या निर्णयामागे केवळ विकासाचा मुद्दा नाही, तर स्पष्ट राजकीय आणि सामरिक संदेशही दडलेला आहे. भारतावर दबाव निर्माण करण्यासाठी बांगलादेश चीनचा वापर करत असल्याचे चित्र दिसते. भारताने आमच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले, तर आमच्याकडे दुसरा पर्याय आहे, असा अप्रत्यक्ष संदेश ढाका देत आहे. कुत्र्याचे शेपूट वाकडे असलेल्या कट्टरपंथी इस्लामिक देशाचे हे धोरण भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी चिंतेचे कारण ठरू शकते. चीनच्या दृष्टीने हा प्रकल्प अधिक महत्त्वाचा आहे. कारण तिस्ता प्रकल्पाचा परिसर भारताच्या अत्यंत संवेदनशील 'सिलीगुडी कॉरिडॉर'जवळ आहे. हा 'चिकन्स नेक' म्हणून ओळखला जाणारा अरुंद पट्टा ईशान्य भारताला उर्वरित देशाशी जोडतो. येथे चीनची उपस्थिती वाढणे म्हणजे भारताच्या सुरक्षेसाठी मोठे आव्हान ठरू शकते. चीनने पाकिस्तानमध्ये ग्वादर बंदर, श्रीलंकेत हम्बनटोटा बंदर आणि नेपाळमध्ये पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या माध्यमातून आपला प्रभाव वाढवला आहे. आता बांगलादेशातही त्याच धोरणाची पुनरावृत्ती होत असल्याचे दिसते. 'बिल्ट अँड रोड' उपक्रमाद्वारे चीन अनेक देशांना मोठ्या कर्जांच्या जाळ्यात अडकवत आहे, अशी टीका वारंवार होत आली आहे. सुरुवातीला विकासाच्या नावाखाली आर्थिक मदत देणे आणि नंतर त्या प्रकल्पांवर प्रभाव निर्माण करणे, हे चीनचे धोरण राहिले आहे. बांगलादेश या सापळ्यात अडकू नये, ही जबाबदारी तेथील नेतृत्त्वावर आहे. परंतु त्यांची तेवढी बौद्धिक कुवत नसल्यामुळे ते चीनच्या जाळ्यात फसत चालले आहेत. मात्र भारतानेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. शेजारी देशांशी संबंध मजबूत ठेवण्यात भारत काही प्रमाणात कमी पडत असल्याचे अलीकडील घटनांवरून दिसते. नेपाळ, मालदीव, श्रीलंका आणि आता बांगलादेश या देशांमध्ये चीनचा वाढता प्रभाव भारतासाठी धोक्याची घंटा आहे. केवळ ऐतिहासिक मैत्री किंवा सांस्कृतिक जवळीक यावर संबंध टिकत नाहीत; त्यासाठी वेळेवर निर्णय, आर्थिक सहकार्य आणि राजकीय संवेदनशीलता आवश्यक असते. भारताने तिस्ता प्रश्न तातडीने सोडवण्याचा गंभीर प्रयत्न करणे आवश्यक आहे. केंद्र आणि पश्चिम बंगाल सरकार यांच्यात समन्वय साधून व्यवहार्य तोडगा काढला पाहिजे. कारण प्रलंबित प्रश्न जितका लांबेल, तितकी चीनला संधी मिळत राहील. यासोबतच बांगलादेशाशी आर्थिक, व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्याचीही गरज आहे. दक्षिण आशियातील स्थैर्य भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. चीनचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी केवळ आक्रमक वक्तव्ये पुरेशी नाहीत; तर प्रभावी कूटनीती आणि विश्वासार्ह सहकार्य आवश्यक आहे. तिस्ता नदीचा प्रश्न हा भारतासाठी केवळ जलवाटपाचा विषय राहिलेला नाही, तर तो राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रादेशिक नेतृत्वाच्या कसोटीचा प्रश्न बनला आहे.

# लहान लहान नद्या वाचवायला हव्यात

दक्षिण-पूर्व राजस्थानच्या बुंदी जिल्ह्यात एक छोटेसे गाव आहे - सथूर. या गावात वर्षानुवर्षे एकाही नदीचे अस्तित्व लोकांना दिसले नव्हते. अलीकडेच कोटा येथील काही विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पुरातत्वशास्त्रज्ञांच्या मदतीने या गावातील एका लहान नदीचा प्रवाह शोधून काढला. चंद्रभागा नावाची ही नदी गावाभोवती नाल्याच्या रूपात वाहते. अनेक दशकांपासून याला नाला मानणारे स्थानिक लोक हा नाला म्हणजे एका प्राचीन नदीचे अवशेष आहे हे जाणून रोमांचित झाले आहेत. आता या साथुर नदीचे वैभव परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत.



सततच्या दुर्लक्षामुळे घाण नाल्यात रुपांतर झालेली ही काही देशातील एकमेव नदी नाही. जयपूरच्या अमानिशाह नाल्याचे प्रकरण तर देशभर चर्चेत होते. जयपूर शहराच्या आजूबाजूला जेव्हा जेव्हा मुसळधार पाऊस पडत असे तेव्हा तेव्हा हा नाला ओसंडून वाहत असे आणि आजूबाजूच्या वस्त्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होत असे. नंतर पुरातत्वशास्त्रज्ञांनी सांगितले की, खरे तर हा नाला 'द्रव्यवती' या प्राचीन नदीचा प्रवाह मार्ग आहे. लोकांच्या दुर्लक्षामुळे आणि निष्काळजीपणामुळे संपूर्ण नदीचे नाल्यात रूपांतर झाले आहे. नदीपात्रात अतिक्रमण झाले होते. काही वर्षांपूर्वी या नदीचे पुनरुज्जीवन करण्याचा ठराव शासनाने घेतला. नदीला जीवनदान मिळाले आणि आज द्रववती नदीचा किनारा जयपूर शहराच्या मुख्य आकर्षणांपैकी एक झाला आहे. अशाच प्रकारे लोकांच्या सहभागातून महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील अग्रणी नदी आणि पंढरपूरच्या चंद्रभागा नदीची उपनदी झालेली कासाळगंगा, राजस्थानमधील करौली जिल्ह्यातील महेश्वरा नदी व सैरनी नदी, उत्तर प्रदेशातील ललितपूर जिल्ह्यातील बंडई नदी, महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील अंबेजोगाईची होळणा आणि वाणा नदी पुनर्जीवित झाल्या आहेत. नाल्यात रूपांतर झालेल्या लहान लहान नद्यांना लोक चळवळीतून पुनर्जीवित केले जात आहे, ही मोठी सकारात्मक गोष्ट म्हणावी लागेल. मात्र अजूनही फार मोठे काम हाती घ्यावे लागणार आहे.

डॉ. राजेंद्र सिंह म्हणतात, लोकसहभागातून जलसंवर्धन आवश्यक आहे. जवळपास १३ हजार ८०० जलस्रोत लोकसहभागातून पुनरुज्जीवित केले. त्याद्वारे तब्बल १७ लाख लोकांना रोजगार मिळाला. पाण्याचे संकट ही जागतिक समस्या असली, तरी त्यावरील उपाय हा स्थानिक आहे- आपल्याकडे कमी वेळात जास्त पाणी उपसा व प्रदूषण करणारे आहेत, परंतु जलसंवर्धकांची कमतरता आहे - आधुनिक शिक्षण पद्धती माणसाला स्वार्थी बनवत आहे- देशात १७ राज्ये आणि ३६५ जिल्ह्यांना पाणी टंचाई, दुष्काळाने ग्रासले आहे. आपल्याकडील ३० टक्के जमीन पुराखाली, तर ६० टक्के जमीन दुष्काळाखाली आहे. ही विसंगती कमी झाली पाहिजे. भारतीय जीवनात नद्यांना खूप महत्त्व आहे. म्हणूनच नद्यांना माता म्हणतात. त्यावेळची गोष्ट आहे, जेव्हा दिवसाची सुरुवात नद्यांच्या काठावरुन व्हायची. नदीच्या काठावर स्नान आणि ध्यान केल्याने घाटांचे सौंदर्य टिकून राहायचे. पण माणसाला लागणारे पाणी नळांद्वारे घराघरात पोहोचले, तेव्हा नद्या, विहिरी, तलाव, सरोवरे, जोहाड या सर्वांचे महत्त्व कमी होऊ लागले. नद्यांच्या पाण्याच्या वापराशी पुण्य आणि सुखाच्या प्राप्तीशी जोडली असल्याने नद्यांशी निगडीत कर्मकांडाची जाणीव मानवाला राहिली, पण नद्यांच्या प्रवाहाची शुद्धता राखण्याच्या जबाबदारीकडे त्याने पाठ फिरवली.हळूहळू नद्यांची दुर्दशा होऊ लागली.

महाभारतात एके ठिकाणी लिहिले आहे - 'अतिपरिचयाद् अवग्या भवति'. खूप जवळीक कधी कधी दुर्लक्षाचे कारण बनते. नद्यांचेही तेच झाले. जोपर्यंत मानवाला नद्यांची गरज होती तोपर्यंत त्याने त्यांची खऱ्या मनाने पूजा केली. जेव्हा त्यांची गरज भागते तेव्हा त्याची उपासना ढोंगी बनते. या दुर्लक्षामुळे छोट्या नद्यांना खूप त्रास झाला.त्यांचे पाणलोट क्षेत्र कमी असल्याने साहजिकच दुर्लक्ष झाल्याने त्यांचे रूपांतर नाल्यात झाले. अनेक ठिकाणी नद्यांच्या काठावरील अतिक्रमणामुळे नद्यांचे अस्तित्वच संपुष्टात आले आहे. मुंबईतील मिठी, दहिसर, ओशिवरा आणि पैसार नद्यांची सद्यस्थिती दर्शवते की माणसाच्या जमिनीच्या अखंड लोभामुळे नद्यांचे काय हाल झाले आहेत. काही वर्षांपूर्वी जेव्हा चेन्नईला पूर आला होता, तेव्हा कूम, अडयार आणि कोर्टलाय्यार नद्यांच्या बाजूने वस्त्या झाल्यामुळे पावसाचे पाणी वस्त्यांमध्ये शिरल्याचे दिसून आले. ही कोणत्याही एका शहराची गोष्ट नाही.

वास्तविक देशभरातील लहान नद्या त्यांच्या दुर्दशेवर अश्रू ढाळत आहेत. पुराणानुसार, राजा दुष्यंत आणि शकुंतला यांची भेट कण्व ऋषींच्या आश्रमात झाली, तिच्या बाजूने एक नदीही वाहत होती. कोचिंगसाठी देशभरात प्रसिद्ध असलेले कोटा शहरात एक ऐतिहासिक ठिकाण आहे - कानसुआ. येथे महर्षी कण्वांचा आश्रम होता असे म्हणतात. पण त्या 'मालिनी' नदीचे नाव कानसुआमध्ये आढळत नाही. मात्र जर तुम्ही प्राचीन मंदिराच्या छतावर चढलात, तर तुम्हाला नदीच्या प्रवाहाच्या खुणा स्पष्टपणे दिसू शकतात, जी आता एका गलिच्छ औद्योगिक नाल्याचा प्रवाह बनली आहे. सत्तरीच्या दशकापर्यंत पावसाळ्याच्या दिवसात या ठिकाणचे दृश्य अतिशय मनमोहक असायचे. हा एकेकाळी पावसाळी नदीचा प्रवाही मार्ग असावा हे स्पष्ट आहे.

उत्तर प्रदेशातील फैजाबाद जिल्ह्यातील सुमारे अर्धा डझन लहान नद्यांचे अस्तित्व संकटात आहे. यामध्ये गोमतीच्या उपनद्यांची नावे देखील समाविष्ट आहेत - तिलोडकी, तमसा, मधा, बिसुही आणि कल्याणी. तमसा आणि कल्याणी नद्या पौराणिकदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जातात. सहारनपूरची पावनधोई नदीही घाण नाल्यात रूपांतरित झाली होती, मात्र लोकांच्या जागृतीमुळे तिची वाईट अवस्था दूर करण्यात काही प्रमाणात यश आले आहे. पण काली हिंडन, मानसियत आणि गुंता या नद्या त्यांच्या उद्धाराच्या प्रतीक्षेत आहेत.उत्तराखंडच्या कुमाऊं विभागात स्वाल नदी आपले अस्तित्व गमावत आहे. बिहारमधील कटिहारमधून जाणाऱ्या भासना, चापी, कमला आणि पलतानिया नद्या उन्हाळा सुरू होताच दम टाकतात. सातपुड्यातील दुधी, मच्छवासा, अंजन, ओल, पलकमती आणि कोरणी नद्यांची स्थितीही चांगली नाही. मध्य प्रदेशातील दुधी नदी काही काळापर्यंत बारमाही नदी मानली जात होती, परंतु आता तिची पाण्याची पातळी खूप खालावली आहे. देशातील अशा अनेक छोट्या नद्या काळाच्या ओघात पराभूत झाल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील २१ नद्या पुनरुज्जीवित करण्यासाठी माविआ सरकारने आवश्यक निधीचा प्रस्ताव निती आयोगाकडे पाठविला होता.

छोट्या नद्यांच्या दुर्दशेमुळे मोठ्या नद्यांच्या पाण्याचा प्रवाहही कमी झाला आहे. नॅशनल रिसर्च इन्स्टिट्यूट, नागपूरने काही दिवसांपूर्वी एका अहवालात म्हटले होते की, गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी आणि कावेरी यासह देशातील चौदा प्रमुख नद्यांमध्ये देशातील ८५ टक्के पाण्याचा प्रवाह आहे.या सर्व नद्या इतक्या प्रदूषित झाल्या आहेत की, देशातील सहासष्ठ टक्के आजारांचे कारण या नद्या ठरत आहेत. अशा प्रकारे, देशातील सुमारे २२३ नद्यांमध्ये असे आढळून आले आहे की, तुम्ही त्यामध्ये स्नान करू शकत नाही आणि त्यांचे पाणी पिऊ शकत नाही. ही परिस्थिती भीतीदायक आहे. विशेषत: जेव्हा तज्ञांचा असा विश्वास आहे की २०३० पर्यंत जगातील पाण्याची मागणी एकूण पुरवठ्यापेक्षा जास्त होईल.याचं एक मोठं कारण हेही आहे की आपण नद्यांच्या प्रवाहात अडथळे आणले आहेत, अडथळे निर्माण केले आहेत आणि त्यात आपला आत्मा ओतणाऱ्या छोट्या नद्यांची आपण पर्वा केली नाही.नद्यांच्या काठावर अतिक्रमण करून आम्ही विकासाचा नारा बुलंद करत आहोत.

साहजिकच नद्या दु:खी नसतील तर काय? ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, नेदरलँड्ससह युरोपातील विविध देशांमध्ये नद्यांचे बंधारे तोडले जात असून नद्यांना उत्स्फुर्त प्रवाहाचे स्वातंत्र्य दिले जात आहे.या संदर्भात, लहान नद्यांचे पुनरुज्जीवन करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण लहान नद्या केवळ विशिष्ट क्षेत्राची पाण्याची गरज भागवत नाहीत, तर अनेक लहान नद्या मिळून एक मोठी नदी आपल्या समर्पणाने समृद्ध करतात. छोट्या नद्या वाचवण्यासाठी संसाधनांपेक्षा अधिक दृढनिश्चय आवश्यक आहे. गुरु नानकदेव यांनी एकदा पंजाबमधील सात किलोमीटर लांबीच्या कालीबाई नदीच्या काठावर काही दिवस घालवले होते, परंतु आज सर्वांच्या दुर्लक्षामुळे नदीचे नाल्यात रूपांतर झाले होते. संत बलवीर सिंग सिचेवाल यांनी ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची असलेली ही नदी वाचवण्याचा संकल्प सोडला. त्यांचे समर्पण पाहून लोक सामील होत गेले आणि आज कालीबाई नदी पुन्हा पूर्ण सौंदर्याने वाहत आहे. लहान नद्यांबाबत संवेदनशील असायला हवे, अन्यथा येणारे दिवस संपूर्ण समाजासाठी खरोखरच कठीण असतील.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# हिमालयाची सावली; त्यागमूर्ती माता रमाई

आज २७ मे, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे (वलंगकर) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई-वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई-वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहात होते. वलंगकरांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणीच सुभेदारांनी तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली.



रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होते. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खूप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही. त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला. मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या.

माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरिबीशी जिद्दीने झगडत होत्या. मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई-वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले, पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण, गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण, गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण, गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या.

जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# सावधान, प्राण्यांचा बळी नकोच!

आज कोणी गोहत्या बंद करा असा सूर काढतात तर कोणी त्याच्या विरुद्ध बाजूनं बोलतात. खरंच गोहत्या बंदच व्हायला हवी. कारण गाय आपल्याला दूध देते. सरपणासाठी तसेच आपल्या शेतात भरघोष पीक यावे, म्हणून शेण देते. तसं पाहता गाईचे भरपूर उपयोग आहेत.

गाईचे जसे उपयोग आहेत, तसेच उपयोग सृष्टीतील प्रत्येक जीवजंतूंचेही आहेत. लहानसा दही बनविणारा जीव पोटात गेल्यावर आपल्या अन्नाचेही पचन करतो. तशीच लहानशी दिसणारी मधमाशी आपल्याला बहूगुणी शहद देत असते. इवलंसं दिसणारं गांडूळ आपल्याला गांडूळखत देत असते.

काही प्राणी आपलं मनोरंजनही करु शकतात नव्हे तर करीत असतात. जशी. कुत्री, माकड किंवा ऊंट वा बकरी सुद्धा. सर्कशीत लहानशा धाग्यावर चालणारी बकरी, माकड तसंच लहानशा स्टुलवर बसणारा हत्ती आणि ऊंट आपण नेहमीच पाहतो. बिचारे धाकानं अशी अशी कौशल्य करतात की, जे कौशल्य पाहून आपण आश्चर्यचकीत होवून जातो. आपण पाहतो की सर्कशीत वाघ, सिंहासारखे अजस्र प्राणीदेखील मोठमोठे कौशल्य दाखवून जातात.

प्राण्याबाबत आपल्याला त्यांचे उपयोग दिसत नाही. आपल्याला दिसते आपल्या जिभेचे चोचले. आपल्याला प्राण्यांचे सर्कशीत कौशल्य आवडत नाही. त्यांनी सर्कशीत आपले केलेले मनोरंजन आपल्यासमोर फिकं वाटतं. कारण आपलं मनोरंजन असतं आपल्या जिभेची चव. मग आपण आपला राष्ट्रीय प्राणी विसरतो. आपण आपला राष्ट्रीय पक्षी विसरतो आणि नाहक आपलं मनोरंजन म्हणून आपल्या जिभेचे चोचले पुरविण्यासाठी त्यांचा बळी घेतो.



पूर्वीही अशीच प्राण्यांची हत्या व्हायची. यज्ञात पशुबळी म्हणून बैल, घोडा, रेडा दिला जायचा. गाईला माता संबोधून तिचा बळी दिला जात नसे. तसाच राजा हा शिकारीचा हौशी असल्याने आपलं मनोरंजन म्हणून शिकार करायचा. विनाकारण प्राण्यांचा अपराध नसताना बळी घेतले जायचे. त्यातच कधीकधी प्राण्यांच्या शर्यतीही लावल्या जात असत. यात कोंबड्यांची झुंज, शंकरपटात बैलाच्या शर्यती, काही ठिकाणी रेड्याला व ऊंटाला शर्यतीत लावले जाई. काही ठिकाणी रेडी, बैल, बोकड आणि एडक्यांच्या टकरी होत. हे आपल्यासाठी मनोरंजनच असे. यात जो प्राणी हारला, त्या प्राण्याला सर्रास कापले जाई. त्यात हारजीत ठरलेली असताना त्या प्राण्यांचा कोणता दोष असायचा की ते प्राणी मारले जायचे?

महत्वाचं सांगायचं म्हणजे आपलं मनोरंजन होते आणि दोष नसतांना विनाकारण त्या प्राण्यांचा बळी जातो. आपले जिभेचे चोचले पुरवले जातात आणि विनाकारण आपल्या जिभेच्या चोचल्यासाठी ते प्राणी मारले जातात. विशेष म्हणजे आपल्या मनोरंजनासाठी त्या प्राण्यांचा कोणताही अपराध नसतांना बळी का घ्यावा? याचा विचार कोणीही करीत नाहीत. आपल्याला काय करायचं असा विचार करून सर्वच लोकं सृष्टीतील हे महत्वाचे घटक कमी करीत आहेत. आपल्याला माहीत नसेल की, काल आपल्या दारासमोर येणारा चिमण्यांचा आवाज कमी झाला. कारण काय, तर आपलेच मनोरंजन. आपण आपल्या मनोरंजनासाठी मोबाईल काढला. परंतु आपल्याला माहीत नसेल की, याच मोबाईलमधून निघणाऱ्या घातक ध्वनीलहरीनं त्यांच्या शरीरावर परिणाम होवून त्यांचा बळी जातो. आज आपल्याला कावळे, बेडकं आणि सापही दिसत नाहीत. ही मानवतस्करीच आहे. सापाच्या जहरातून घातक असं नशा येणारं इन्सुलिन तयार केलं जातं म्हणून तस्करी. तसंच कावळ्याचंही आहे. आज सापाची व बेडकाची तस्करी झाल्यानं उंदरांची संख्या वाढताना दिसत आहे. परंतु काही दिवसांनी उंदरंही कमी होतील. कारण अलीकडे कोणत्याही आजारावर औषधांचा प्रयोग करण्यासाठी तो प्रयोग आधी उंदरावर केला जात आहे. जो पुर्वी बेडकावर केला जायचा. परंतू मानवतस्करीच बेडकांची संख्या कमी झाल्यानं आता उंदरं पकडली जातात.

ज्याप्रमाणे निसर्गातील साप, बेडकं कावळे पकडली जातात. तशीच जंगलातील वाघ सिंहाची संख्या आता अतिशय कमी झालेली आहे. बोटावर मोजण्याइतकीच आहे. शिकारीदरम्यान वाघ, सिंहाला मारले गेल्याने त्यांची संख्या कमी होणे साहजिकच आहे.

वाघ, सिंह, कावळे, उंदरं, बेडकं आणि तत्सम त्यासारखे जीव, मग त्यात गांडूळासारखे प्राणी का असेना, हे सर्व जीव सृष्टीतील समतोल राखणारे जीव. ते आहेत म्हणून आपणही आहोत. नाहीतर आपल्याला कोणी कुत्रही विचारणार नाही. आपल्याला माहीत नसेल की आपल्या जिभेचे चोचले पुरवले जातात. परंतु त्यांचा नाहक बळी जातो. आपले मनोरंजन होते. परंतु त्यात त्यांना किती त्रास होतो. कदाचित ते विचारच करीत असतील आणि दररोज विधात्याला साकडे घालत असतील की हे विधात्या, आपण एकदा तरी या मानवाला आमचा जन्म दे आणि मानवाचा आम्हाला. मग पाहू. कदाचीत जर त्यांचं विधात्यानं ऐकलं आणि आपल्याला मानव जन्मातून मुक्ती मिळाली आणि त्यांचा जन्म मिळाला तर पाहा, आपली काही खैर नाही. म्हणून एक आपला विचार की आपले मनोरंजन करा. करायला मनाई नाही. परंतू जरा विचार करुन. कारण पुराणशास्र सांगतं की आपला जन्मच मुळात कित्येक योनी फिरुन झाला. त्यामुळंच कधी ना कधी त्यांचाही जन्म आपल्याला मिळणारच. मग आपण जसा त्यांच्याशी या जन्मात व्यवहार केला. तसाच व्यवहार ते त्या जन्मात आपल्याशी करतील यात शंका नाही. म्हणून आपणच आज त्यांच्याशी सौहार्दपूर्ण व्यवहार करावा. जेणेकरुन आपल्यावर जेव्हा वेळ येईल तेव्हा तेही आपल्याशी सौहार्दपूर्ण व्यवहार करतील यातही शंका नाही. म्हणून प्राण्यांचा बळी घेतांना सावधान. मग ते प्राणी गाई, बकरे वा कोंबडे असो वा इतर कोणतेही.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# जिल्हा परिषदेच्या अभिनव सेवानिवृत्तीपूर्व प्रशिक्षण शिबिराचा समारोप

## सेवानिवृत्ती नव्या आयुष्याची सकारात्मक सुरुवात



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने विविध विभागातील पुढील सहा महिन्यांत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय सेवानिवृत्तीपूर्व प्रशिक्षण शिबिराचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित या अभिनव उपक्रमाला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य अधिक सक्षम, सुरक्षित आणि आनंदी व्हावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण शिबिरात आर्थिक नियोजन, आरोग्य, मानसिक स्वास्थ्य, सायबर साक्षरता, जीवनशैली व्यवस्थापन तसेच सामाजिक सहभाग अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

यावेळी मंचावर सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड, लेखाधिकारी निळकंठ पांचगे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शुभम तेलेवाड आदी उपस्थित होते.

समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सेवानिवृत्ती ही केवळ सेवेतून मुक्तता नसून आयुष्याच्या नव्या पर्वाची सुरुवात असल्याचे सांगितले. सेवाकाळातील अनुभव, समाजासाठी दिलेले योगदान आणि पुढील आयुष्यातील सकारात्मक दृष्टीकोन यांचा समतोल साधणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी आर्थिक फसवणूक कशी टाळावी याविषयी एसबीआयचे हरिश यादव, आरोग्य विम्याविषयी गौरव जोशी, पेन्शन लोनविषयी कपील ढवळे, प्रवास करताना घ्यावयाची काळजी याविषयी कुलदीप जोशी, तर सेवानिवृत्तीनंतर इन्शुरन्स व इतर क्षेत्रांमध्ये उपलब्ध संधी याविषयी एलआयसीचे विकास अधिकारी ज्ञानेश्वर थोटे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद व्यवहारे यांनी केले.

जिल्हा परिषदेने प्रथमच राबविलेल्या या उपक्रमामुळे सेवानिवृत्तीनंतरच्या जीवनाकडे नव्या आत्मविश्वासाने पाहण्याची दिशा मिळाल्याची भावना सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. अशा प्रशिक्षणामुळे मानसिक, सामाजिक आणि आर्थिक तयारीस मोठी मदत होत असल्याचे मतही अनेकांनी व्यक्त केले.

यावेळी सहभागी कर्मचाऱ्यांना शुभेच्छा प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात आल्या. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव, आठवणी आणि सेवानिवृत्तीनंतरच्या नियोजनाविषयी मनोगते व्यक्त केली. सभागृहात भावनिक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते.

**ज्येष्ठ नागरिकांनी भावनेपेक्षा भविष्यातील सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे –भार्गवी मुंडे**

वृद्धापकाळात आर्थिक स्थैर्य, सन्मान आणि कौटुंबिक शांतता टिकवून ठेवण्यासाठी वसीयत आणि वृद्धापकाळातील आर्थिक सुरक्षितता या विषयांवर सीएम फेलो भार्गवी मुंडे यांनी मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या मालमत्तेचे नियोजन कायदेशीर पद्धतीने करावे, वसीयत तयार करताना तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, तसेच स्वतःच्या आरोग्य, निवास व दैनंदिन खर्चासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद ठेवावी. भावनेपेक्षा भविष्यातील सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेले सेवानिवृत्तीपूर्व प्रशिक्षण शिबीर हे केवळ औपचारिक मार्गदर्शन न ठरता, सेवेनंतरच्या आयुष्याची सकारात्मक तयारी करून देणारे व्यासपीठ ठरले. शासकीय सेवेत अनेक वर्षे योगदान दिल्यानंतर अचानक बदलणाऱ्या जीवनशैलीशी जुळवून घेताना येणाऱ्या आर्थिक, मानसिक आणि सामाजिक आव्हानांचा विचार करून या शिबिराची संकल्पना राबविण्यात आली.

–**मेघना कावली**, सीईओ जि.प. नांदेड

# दहावीची परीक्षा दिशादर्शन करणारी प्रकाशवाट असते –डॉ. गोविंद नांदेडे



**नांदेड (प्रतिनिधी)** –दहावीची परीक्षा आणि या परीक्षेतील उज्ज्वल यश हे जीवनाची दिशादर्शन करणारी प्रकाशवाट असते. हीच परीक्षा पुढे आयुष्याला प्रेरणा देत नवनव्या संधींची दारं उघडत असते, असे प्रतिपादन राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले आहे. ते गोकुळनगरातील अशोक विद्यालयातील इयत्ता दहावीमध्ये यश प्राप्त केलेल्या यशवंतांच्या सत्कार समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव चांडोळकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सुधाकर देव यांनी शाळेमधील इयत्ता दहावीतील यशवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी साईनाथ मुदखेडे, कृष्णा हेरे, रेणुका गवळी, साक्षी राणे, संध्या मुधोळ, नरसिंग टेकवार, स्वाती कुरुडे, श्रेयसी वानखेडे, राधिका कळणे, आणि शौर्य वानखेडे या सर्वाधिक गुण प्राप्त केलेल्या यशवंतांचा पालकांसह सत्कार करण्यात आला. अशोक विद्यालयाचे मुख्याध्यापक गंगाधर वनंजे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

या प्रसंगी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्रेमाला बद्देवाड यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यंकटराव चांडोळकर यांनी विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुट्ट्यांमध्ये तीव्र उन्हात न फिरता अकरावीचा अभ्यास पूर्ण केल्यास बारावीची तयारी लवकर सुरू करता येईल असे सांगून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता टोकलवाड यांनी केले तर उपस्थितांचे आभार शिक्षक हौसाजी नागरगोजे यांनी मानले.

# बारावी परीक्षेचे गुणपत्रक वाटप सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या लातूर, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक व कोकण या विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपद्धतीनुसार अधिकृत संकेतस्थळावर शनिवार २ मे २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेचे गुणपत्रक तथा प्रमाणपत्र, स्थलांतर प्रमाणपत्र, तपशीलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप संबंधित विभागीय मंडळामार्फत सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना सोमवार २५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वा. करण्यात आले आहे.

शाळा, कनिष्ठ महाविद्यालया–मार्फत विद्यार्थ्यांना गुणपत्र तथा प्रमाणपत्र वाटप करण्यात येत आहे. याबाबत विभागीय मंडळांमार्फत सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित केले आहे. लातूर विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व संबंधित प्राचार्य, विद्यार्थी, पालकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी केले आहे.

# सिडकोत श्री भगवान बालाजींचा ३६ वा ब्रम्होत्सव उत्साहात साजरा

## हभप अशोक महाराज पुयड आळंदीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको येथील भगवान बालाजींचा ३६ वा ब्रम्होत्सव दि. १८ ते २५ मे दरम्यान उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी होमहवन विधी व श्रीमद भागवत पारायण भागवताचार्य हभप कलिंदीताई पंढरपूरकर यांच्या सुमधुर वाणीतून तर हभप अशोक महाराज पुयड आळंदीकर यांच्या काल्याचे कीर्तन पार पडले. यानिमित्त महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिडको येथील भगवान बालाजी मंदिरात ३६ वा वार्षिक ब्रम्होत्सव आयोजित करण्यात आला होता. ब्रम्होत्सवानिमित्ताने मंदिर व परिसरात आकर्षक रोषणाई व सजावट करण्यात आली होती. दि. २१ ते २५ मे दरम्यान आचार्य पंडित सतीश गुरू पोतदार व मंदिर पुजारी दिव्यांशु महाराज यांच्या आचार्य तत्वाने सकाळी अभिषेक, होमहवन व दुपारी १ ते



४ वाजेपर्यंत भागवताचार्य हभप कालिंदीताई पंढरपूरकर यांच्या मधुर वाणीतून भागवत कथा आयोजित करण्यात आली होती. दि. २४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता श्री भगवान बालाजी व लक्ष्मी पद्मावती उत्सव मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली होती.

या मिरवणुकीसोबत भजनी मंडळात महिला–पुरुष सहभागी झाले होते. तर रात्री ९ वाजता कल्याण उत्सव व श्री भगवान बालाजी लक्ष्मी पद्मावती विवाह सोहळा संपन्न झाला.

यावेळी श्री भागवत यजमान रामचंद्र शंकरराव कोटलवार, साहेबराव जाधव, श्रीमती कमल देशमुख आदी उपस्थित होते. यावेळी भागवत कथेस बाळगीर महाराज भोसीकर, देवानंद महाराज गिरी, ऋषीकेश गिरी यांच्यासह उध्दव महाराज यांनी साथ–संगत दिली. दि. २५ मे रोजी सकाळी महाभिषेक आरती, तीर्थ प्रसाद, होमहवन, पूर्णाहुती ब्राम्हण सन्मान, महाआशीर्वाद काल्याचे कीर्तन, हभप अशोक महाराज पुयड आळंदीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने सांगता झाली.

वार्षिक ब्रम्होत्सव साजरा करण्यासाठी विश्वस्त समिती अध्यक्ष साहेबराव जाधव, कोषाध्यक्ष बाबुराव बिरादार, सचिव व्यंकटराव हाडोळे, विश्वस्त मंडळ तुकाराम नांदेडकर, आनंद बासटवार, डॉ. नरेश रायेवार, गोविंद सुंकेवार, वैजनाथ मोरलवार, रामचंद्र कोटलवार, पुंडलिक बिरादार यांच्यासह उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र दाखल करताना अवलंब करावयाची कार्यपद्धत

**नांदेड (प्रतिनिधी)**–नांदेड विधान परिषदेच्या स्थानिकप्राधिकारी मतदार–संघाची द्विवार्षिक निवडणूक–२०२६ निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र दाखल करताना अवलंब करावयाच्या कार्यपद्धीतीबाबत जिल्हा दंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश २२ मे २०२६ रोजी निर्गमीत केले आहेत.

या निवडणूक कालावधीत नांदेड जिल्ह्यात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करताना कार्यालयाच्या १०० मीटरच्या बाहेर वाहने व मिरवणूक थांबवावी. वाहनांच्या ताफ्यामध्ये ३ पेक्षा जास्त मोटार गाड्या, वाहनांना तसेच नामनिर्देशन–पत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात उमेदवारांसोबत सुचक, अनुमोदक अथवा दोन व्यक्ती असे तीनपेक्षा जास्त व्यक्तींना तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे, कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध करण्यात आला आहे.

हा आदेश नांदेड जिल्ह्यातील नांदेड विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षीक निवडणूक–२०२६ निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या हद्दीपर्यंत २५ मे २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते ४ जून २०२६ रोजी २४ वाजेपर्यंत अंमलात राहील.




**नांदेड**– बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात अनुचित प्रकार घडू नये व सर्वसामान्य नागरिकांना हा उत्सव भयमुक्त वातावरणात साजरा करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर आणि विमानतळ पोलिसांच्यावतीने संयुक्त रूट मार्च काढण्यात आला. यावेळी भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, विमानतळ ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे, पोलीस उपनिरीक्षक सचिन सोनवणे, विनोद देशमुख, नरेश वाडेवाले यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड, महिला कर्मचारी सहभागी झाले होते.

# महाराष्ट्रात मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्यात मतदार यांद्यांची विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम राबविण्यात येत आहे.

भारतीय संविधानाच्या कलम ३२४ अन्वये प्राप्त अधिकारात भारत निवडणूक आयोगाने संपूर्ण देशात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण घेण्याबाबत २४ जून २०२५ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशात नमूद केल्याप्रमाणे यापूर्वी देशामध्ये १९५२–५६, १९५७, १९६१, १९६५–१९६६, १९८३–८४, १९८७–८९, १९९२–१९९५, २००२–२००४ यावर्षी विशेष सखोल पुनरिक्षण घेण्यात आलेले आहे. भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. संविधानाच्या कलम ३२६ प्रमाणे मतदार यादीमध्ये मतदारांचे नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित व्यक्ती भारताचा नागरिक असणे तसेच वयाची १८ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे.

मागील २० वर्षामध्ये विशेष सखोल पुनरिक्षण घेण्यात आलेले नाही. दरवर्षी केवळ विशेष संक्षिप्त पुनरिक्षण घेण्यात आलेले आहे. मागील २० वर्षात मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात समावेशन आणि वगळण्या झालेल्या आहेत. झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणात एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणाकडे स्थलांतर झालेले आहे. असे करताना अनेक वेळा काही मतदारांनी आपल्या वास्तव्याच्या नवीन जागी मतदार यादीमध्ये नव्याने नाव नोंदविले. मात्र, जुन्या ठिकाणचे नाव वगळले नाही. यामुळे मतदार याद्यांमध्ये दुबार नावे वाढली असल्याची शक्यता आहे.

भारतीय संविधानाच्या कलम ३२६ मधील मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने असलेल्या मूलभूत पूर्व अटी विचारात घेता मतदार यादीतील व्यक्ती भारतीय नागरिक आहे याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयोगावर येते. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम २१ नुसार भारत निवडणूक आयोगाला मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण करण्याचे अधिकार आहेत. देशामध्ये पहिल्या टप्प्यात बिहारमध्ये व दुसऱ्या टप्प्यात ९ राज्ये व ३ केंद्रशासित प्रदेशांत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२५–२६ मध्ये राबविण्यात आलेला आहे.

# वाढदिवसानिमित्त १००० झाडे लावण्याचा संकल्प

**लोहा (प्रतिनिधी)**– शहरातील युवा उद्योजक तथा भाजपा पंचायतराज ग्रामविकास मराठवाडा सहसंयोजक माधव पांचाळ यांचा वाढदिवस येणाऱ्या २८ तारखेस साजरा होणार आहे. यावेळी त्यांनी निसर्गास अनुसरून लोहा शहरामध्ये १००० झाडे वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला आहे.

यानिमित्त एका पत्रकार परिषदेत त्यांनी पत्रकारांशी संवाद साधून या उपक्रमाची माहिती दिली. शहरातील सर्व प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी शहरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ७० पार ज्येष्ठ नागरिकांनी 'वय वंदना कार्ड' काढून घ्यावे; डॉ. हंसराज वैद्य यांचे आवाहन

**नांदेड(प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील ७० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी 'वय वंदना कार्ड' त्वरित काढून घ्यावे, असे आवाहन ज्येष्ठ नागरिक संघटनेचे नेते डॉ. हंसराज वैद्य यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात डॉ. वैद्य यांनी म्हटले आहे की, 'आयुष्मान कार्ड' धारकाला वर्षाला ५ लाखांपर्यंत तर ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'वय वंदना कार्ड'मुळे प्रतिवर्षी १० लाख रुपयांपर्यंतचे उपचार विनामूल्य (मोफत) मिळणार आहेत. महागड्या शस्त्रक्रिया आणि गंभीर आजारांचा यात समावेश असल्याने ज्येष्ठ नागरिकांना हा फार मोठा दिलासा आहे. आम्ही स्वतः दोन्ही कार्ड काढले आहेत. नांदेड जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी 'आयुष्मान कार्ड' व 'वय वंदना कार्ड' काढून घ्यावे, असे आवाहन फेस्कॉमचे उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य, सचिव प्रभाकर कुंटूरकर, कोषाध्यक्ष गिरीश बाराळे व कार्यकारिणीच्या वतीने करण्यात आले आहे.

हे दोन्ही कार्ड ज्येष्ठ नागरिकांना वैद्य रुग्णालयात महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी शिबिरात नियमित सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत तर एसटी प्रवास सुविधा कार्ड (स्मार्ट कार्ड) दर सोमवारी ज्येष्ठ नागरिकांना सकाळी दहाच्या पुढे विनामूल्य काढून दिले जात असून, या शिबिरास प्रतिसाद मिळत आहे.

सामान्य 'आयुष्मान कार्ड' धारकांना वर्षाला ५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत मिळत असतानाच, आता ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांच्या वाढत्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन शासनाने विशेष तरतूद केली आहे. 'वय वंदना कार्ड' द्वारे ७० पार केलेल्या प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला प्रतिवर्षी तब्बल १० लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळणार आहेत. विशेष म्हणजे या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतीही अट ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे सर्व ज्येष्ठ नागरिकांची आरोग्याची चिंता मिटण्यास मोठी मदत होणार आहे.

'आयुष्मान कार्ड' आणि 'वय वंदना कार्ड' या दोन्ही वेगवेगळ्या योजना सर्वसामान्यांसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. 'वय वंदना कार्ड' च्या माध्यमातून हृदय शस्त्रक्रिया, बायपास, अँजिओप्लास्टी, गुडघे व सांधे प्रत्यारोपण, कर्करोग (कॅन्सर), किडनीचे आजार, मोतीबिंदू आणि मज्जा संस्थेशी निगडित गुंतागुंतीच्या गंभीर आजारांवर मोफत उपचार केले जातात. यामध्ये औषधी, तपासणी आणि रुग्णालयात भरती होण्यापूर्वीचा खर्चही समाविष्ट असल्याचे डॉ. वैद्य यांनी पत्रकान्वये कळविले आहे.

**पूर्णपणे कॅशलेस आणि पेपरलेस प्रक्रिया**

रुग्णालयात भरती होताना प्रमाणित रुग्णालयात एकही रुपया द्यावा लागत नाही. सर्व प्रक्रिया ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून पार पडते. केवळ 'वय वंदना कार्ड' आणि 'आधार कार्ड' दाखविल्यानंतर प्रमाणित रुग्णालयाकडून उपचाराची प्रक्रिया सुरू होते. ज्या ज्येष्ठ नागरिकांना मोबाईलवर ही प्रक्रिया करणे जमत नाही, त्यांनी जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा 'सेतू केंद्रात' जाऊन आधार कार्डच्या मदतीने हे कार्ड काढून घ्यावे. सर्व ग्रामीण आणि जिल्हा रुग्णालयांतील आयुष्मान कक्षातही ही सुविधा उपलब्ध आहे.

# श्रीसंत रोहिदास मंदिर तीर्थक्षेत्र येथे पार पडला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील श्रीसंत गुरु रविदास मंदिर तीर्थक्षेत्र वर्ग ब बळीरामपूर नांदेड येथील अभ्यासिकेच्या सवलतीचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. त्या अनुषंगाने नुकत्याच जाहीर झालेल्या शालांत परीक्षेत गुणानुक्रमाने उत्तीर्ण झालेले परिसरातील विद्यार्थी विपुल गोडबोले, प्रतीक सूर्यवंशी, आशिष पाईकराव, शैलेंद्र सोनकांबळे, ओम कापूरे, प्रणव सोनकांबळे यांचा ग्रामीण/सिडको पोलीस विभागात कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष पोलीस हेडकॉन्स्टेबल पी. सी. कानगुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास साईनाथ चांदणे, माधव जाधव, स्वराज आंबटवार, अनिरुद्ध पवार, युवराज गोडबोले यांच्यासह पालकवर्ग व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तीर्थक्षेत्राचे संस्थापक वामनराव मे. विष्णुपुरीकर यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन भावी शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. कार्यक्रमाचे आयोजन पवन पवार यांनी केले होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# कूलर वापरताना 'या' चुका आरोग्यासाठी हानिकारक!



**उकाड्यापासून आराम मिळवण्यासाठी प्रत्येकाला एअर कंडिशनर परवडत नाही. त्यामुळे, एअर कूलरचा वापर अजूनही मोठ्या प्रमाणावर केला जातो. पण तुम्हाला माहीत आहे का की घाणेरडे एअर कूलर पॅड्स वेळेवर न बदलल्यास अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. ते तुमच्या घरात अदृश्य प्रदूषणदेखील निर्माण करू शकतात. घरातील वायू प्रदूषण हे बाहेरील तीव्र प्रदूषण किंवा जल प्रदूषणासारखे सहज लक्षात येण्यासारखे नसते. फुफ्फुस तज्ज्ञांच्या मते, जर कूलर पॅड्सची योग्य प्रकारे देखभाल केली नाही, तर धूळ, ओलावा, बुरशी आणि जीवाणू त्यांच्यामध्ये अडकून राहू शकतात, ज्यामुळे घरात दूषित हवेचा संचार होतो.**

## कूलर पॅड्स किती वेळा बदलले पाहिजेत?

सर्वप्रथम, हे समजून घ्या की एअर कूलर पॅड्स दोन प्रकारात येतातः हनीकॉम्ब पॅड्स आणि ग्रास पॅड्स. साधारणपणे उन्हाळ्यात कूलर पॅड्स दर २ ते ३ आठवड्यांनी पूर्णपणे स्वच्छ केले पाहिजेत. जर ते ग्रास पॅड्स असतील, तर तुम्ही प्रत्येक हंगामाच्या सुरुवातीला ते बदलू शकता. जर तुमच्याकडे हनीकॉम्ब पॅड्स असतील, तर कंपनीने दिलेल्या बदलण्याच्या सूचनांचे पालन करा. तसेच, हे लक्षात ठेवा की ज्या घरांमध्ये कूलरचा वापर सतत किंवा दीर्घ कालावधीसाठी केला जातो, तिथे पॅड्सची गुणवत्ता लवकर खराब होऊ शकते. जर तुम्हाला तुमच्या कूलरमधून विचित्र वास येत असल्याचे त्यावर बुरशीचे डाग दिसत असल्याचे, जास्त धूळ साचत असल्याचे किंवा थंड करण्याची क्षमता कमी झाल्याचे लक्षात आले, तर कूलर पॅड्स ताबडतोब बदलले पाहिजेत. हे बदलण्यास उशीर केल्यास थंड करण्याची क्षमता आणि घरातील हवेची गुणवत्ता दोन्ही खालावू शकतात.

## घाणेरडे कूलर पॅड्सने आरोग्याला हानी

कूलर पॅड्स ओलसर राहतात, ज्यामुळे बाहेरील धूळ, प्रदूषक आणि परागकण जमा होतात. हे वातावरण बुरशी, फंगस आणि जीवाणूंच्या वाढीसाठी आदर्श असते. जेव्हा कूलर वापरला जातो, तेव्हा हे घटक घरातील हवेत विरघळतात आणि तुमच्या श्वासाद्वारे तुमच्या शरीरात प्रवेश करतात. बहुतेक लोकांना हे कळत नाही की उन्हाळ्यात त्यांना होणाऱ्या श्वासाच्या समस्या कधीकधी कूलरमधील दूषित हवेमुळे असू शकतात. घरातील वायू प्रदूषणाच्या सततच्या संपर्कामुळे श्वसनमार्गाला नुकसान पोहोचते आणि आधीपासून असलेल्या श्वसनविकारांची स्थिती अधिकच बिघडते.

## कोणते आजार होऊ शकतात?




घाणेरड्या कूलर पॅड्समुळे ॲलर्जी आणि श्वसनसंस्थेचे संक्रमण होऊ शकते. लोकांना सतत शिंका येणे, घशात खवखव, खोकला, श्वास घेताना शिट्टीसारखा आवाज येणे, सायनसमध्ये अडथळा, डोळ्यांतून पाणी येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे यांसारखे अनुभव येऊ शकतात. काही लोकांना कूलरमधील दमटपणामुळे होणाऱ्या बुरशीच्या वाढीमुळे ॲलर्जिक ब्राँकायटिस किंवा फुफ्फुसांवर परिणाम करणाऱ्या अतिसंवेदनशीलतेच्या प्रतिक्रियांचा अनुभव येऊ शकतो. दमा, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी), ॲलर्जिक रायनायटिस किंवा कमकुवत रोगप्रतिकारशक्ती असलेल्या लोकांना या समस्यांचा धोका जास्त असतो, कारण त्यांचे श्वसनमार्ग आधीच संवेदनशील असतात. लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींनाही जास्त धोका असतो, कारण ते हवेतील त्रासदायक घटक आणि संसर्गांना अधिक बळी पडतात.

## दम्याची लक्षणे वाढू शकतात का?

उन्हाळ्यात दम्याचा त्रास वाढणे हे घरातील वातावरणाशी जवळून संबंधित आहे. धुळीचे कण, बुरशीचे बीजाणू आणि दमट हवेमुळे घाणेरडे कूलर दम्याच्या रुग्णांमध्ये श्वसनमार्गाला त्रास देऊ शकतात आणि दाह वाढवू शकतात. कूलरमधील दूषित हवेच्या संपर्कात आल्यामुळे काही रुग्णांना रात्री खोकला वाढणे, छातीत जडपणा जाणवणे, घरघर लागणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे यांसारखे त्रास होऊ शकतात. काही प्रकरणांमध्ये, कूलर स्वच्छ केल्यावर किंवा कूलर पॅड्स बदलल्यावर या लक्षणांमध्ये सुधारणा होऊ शकते.

## कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात?

कूलरची योग्य देखभाल आणि स्वच्छता अत्यंत महत्त्वाची आहे. पाणी साचू नये म्हणून कूलरची टाकी नियमितपणे स्वच्छ केली पाहिजे. पॅड्स नियमितपणे स्वच्छ करून प्रत्येक हंगामात बदलले पाहिजेत. खोलीत योग्य वायुवीजन असणे देखील आवश्यक आहे, कारण जास्त आर्द्रतेमुळे बुरशी वाढू शकते. स्वच्छतेसाठी स्वच्छ पाण्याचा वापर करा आणि वापरात नसताना कूलर कोरडा ठेवा. ज्यांना दमा किंवा श्वसनाचे दीर्घकालीन आजार आहेत, त्यांनी आपले कूलर स्वच्छ करण्याबाबत अधिक काळजी घ्यावी. बहुतेक लोक फक्त कूलरच्या थंड करण्याच्या परिणामावर लक्ष केंद्रित करतात, परंतु श्वसनाच्या आरोग्यासाठी तो स्वच्छ ठेवणे देखील महत्त्वाचे आहे.



# संकटातही आनंदी राहण्याचा मार्ग कोणता?



## लोकांना माहीत नाहीत चांगल्या मानसिक आरोग्याच्या 5 'किल्ल्या'

**आयुष्य कधीच सारखे नसते. कधी आनंदी, कधी दुःखी, कधी सोपे, कधी कठीण. पण जसे अडथळे किंवा समस्या येतात, तसे मन अस्वस्थ होते. अनेक लोक छोट्या-छोट्या अडचणींमुळेही दुःखी होतात. यात विद्यार्थ्यांपासून ते आजी-आजोबांपर्यंत, गृहिणींपासून ते सीईओंपर्यंतचे लोक आहेत. त्या सर्वांमध्ये एक गोष्ट समान आढळते. जसे ते शरीराची काळजी घेतात, तशी आपल्या मनाची काळजी कशी घ्यावी हे त्यांना कोणीही शिकवले नाही. पाच पद्धतींचा अवलंब करून, तुम्ही चांगले मानसिक आरोग्य राखू शकता आणि कठीण काळातही आनंदी व शांत राहू शकता...**

» आपल्या भावनांना नावे द्यायला शिका : आपल्या भावनांना नावे द्यायला शिकावे. त्यांना दाबण्याचा प्रयत्न करू नका, की त्यांना समजून घेण्याचाही प्रयत्न करू नका किंवा त्यांच्याकडे दुर्लक्षही करू नका; फक्त त्यांना नावे द्या. उदाहरणार्थ, 'मी थकलो आहे', 'मी दुःखी आहे','मी काळजीत आहे.' जेव्हा तुम्ही तुमच्या भावनांना नावे देता, तेव्हा तुम्ही त्यांना तुमच्यावर हावी होण्यापासून रोखता. आपल्या संस्कृतीत, शांत आणि संयमी राहणे ही नेहमीच एक शक्तिशाली शक्ती मानली जाते, पण लक्षात ठेवा की शांतता म्हणजे शक्ती नव्हे. ती चुलीवरच्या प्रेशर कुकरसारखी आहे, जी आतून उकळत असते.

» झोप : दुसरी गोष्ट म्हणजे पुरेशी झोप घेणे. दीर्घकाळच्या झोपेच्या कमतरतेमुळे चिडचिड, चुकीचे निर्णय घेणे, आत्मविश्वासाचा अभाव आणि कमकुवत नातेसंबंध यांसारखी इतर कोणत्याही कारणापेक्षा जास्त प्रकरणे दिसून येतात. दररोज रात्री ७ ते ८ तास झोप घेणे ही सोय नसून एक गरज आहे. झोपेच्या वेळी तुमचे मन स्वच्छ होते. तुमच्या मनाला पुरेशी झोप न देणे हे सर्व्हिसिंगशिवाय मशीन चालवण्यासारखे आहे, जे एक दिवस नक्कीच बंद पडेल.

» नातेसंबंधांची संख्या नव्हे, तर गुणवत्ता : तिसरी गोष्ट म्हणजे तुमच्या नातेसंबंधांची संख्या नव्हे, तर गुणवत्ता. ५० वरवरच्या नात्यांपेक्षा एक खरे, प्रामाणिक आणि सुरक्षित नाते तुमच्या मानसिक आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे. सुरक्षित नाते म्हणजे असे नाते जिथे तुम्हाला ढोंग करण्याची किंवा काहीही लपवण्याची गरज नसते. जिथे तुम्ही, 'आज मला बरे वाटत नाही', असे कोणताही गैरसमज होण्याच्या भीतीशिवाय म्हणू शकता. जर तुमचे असे नाते आधीपासून नसेल, तर ते निर्माण करण्याला प्राधान्य द्या. हे नाते एखाद्या मित्रासोबत,



जोडीदारासोबत, भावंडासोबत किंवा थेरपिस्टसोबत असू शकते.

» हालचाल : चौथी गोष्ट म्हणजे हालचाल, म्हणजेच क्रियाकलाप. जिम संस्कृती किंवा फिटनेसच्या ध्येयांवर लक्ष केंद्रित करण्यापूर्वी तुम्ही तुमच्या शरीराला हालचाल देण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. सकाळच्या ताज्या हवेत २० मिनिटे चालल्याने मेंदूतील रसायनशास्त्र बदलते. यामुळे मनःस्थितीचे नियमन, चिंता कमी करणे आणि एकाग्रता वाढवण्यासाठी आवश्यक असलेले हार्मोन्स स्रवतात. जे लोक नियमितपणे चालतात, त्यांच्या झोपेची गुणवत्ता सुधारते, संयम वाढतो आणि मन शांत होते. यासाठी तुम्हाला खूप खर्च येत नाही.

» उद्देश : पाचवा मार्ग म्हणजे उद्देशावर लक्ष केंद्रित करणे. त्याची तुलना महत्त्वाकांक्षा किंवा यशाशी करू नका. तुमच्या दिवसासाठी असा एक उद्देश निवडा जो तुमच्यासाठी महत्त्वाचा असेल. तो तुमच्या कुटुंबासाठी स्वयंपाक करणे, रोपाची काळजी घेणे, तुमच्या मुलाला काहीतरी नवीन शिकवणे किंवा अनोळखी लोकांशी दयाळूपणे वागणे, काहीही असू शकते. जेव्हा आपल्याला आपल्या अस्तित्वाचा उद्देश सापडतो, तेव्हा मोठ्या मोठ्या अडचणीदेखील त्रासदायक वाटण्याऐवजी रोमांचक वाटू लागतात. उद्देशाशिवाय, लहानसहान अडचणीसुद्धा असह्य वाटतात. हे लक्षात ठेवा की मानसिक आरोग्य म्हणजे नेहमी आनंदी राहणे नव्हे. ते एक वास्तव किंवा ध्येय नाही. उलट, एखाद्या कठीण प्रसंगानंतर स्वतःला पुन्हा शोधणे, हे त्याचे उद्दिष्ट आहे. येथे नमूद केलेल्या पाच गोष्टी भावनिक जागरूकता, झोप, खरा संवाद, शारीरिक हालचाल आणि उद्देश या कठीण प्रसंगानंतर हे मानसिक आरोग्य पुन्हा मिळवण्यासाठीची साधने आहेत.

# कानातील मळ साफ का करू नये?

**घरी कान साफ करण्याचा प्रयत्न करू नये. कानात थोड्या प्रमाणात मळ राहणे आवश्यक आहे. कारण तो एक संरक्षक अडथळा म्हणून काम करतो. जर कानातील मळामुळे ऐकू कमी येणे, खाज सुटणे किंवा जळजळ होणे यांसारख्या काही समस्या उद्भवत असतील, तर तज्ज्ञांचा सल्ला घेणे उत्तम. कानाच्या पडद्याला किंवा त्याच्या आतील भागाला होणारे नुकसान टाळण्यासाठी, क्लिनिक्स कान स्वच्छ करण्यासाठी नेहमी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतात...**

कानातील मळ, ज्याला वैद्यकीय भाषेत सेरुमेन (cerumen) म्हणतात, त्यात जीवाणू आणि बुरशीविरोधी गुणधर्म असतात. तो कानाच्या नलिकेतील ग्रंथींद्वारे तयार होतो. जेव्हा चिकट मळ कानाच्या नलिकेत जमा होतो, तेव्हा जीवाणू, धूळ आणि इतर सूक्ष्म कण त्या मळाला चिकटतात, ज्यामुळे ते कानाच्या पडद्यापर्यंत आणि आतील कानाच्या नलिकेपर्यंत पोहोचू शकत नाहीत. यामुळे संसर्ग आणि दुखापतीचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. कानातील मळ नलिकेतील ओलावा टिकवून ठेवण्यासही मदत करतो, ज्यामुळे कोरडेपणा आणि जळजळ टाळता येते.

## कान साफ करताना टाळण्यासारख्या चुका

लोक अनेकदा घरी कान साफ करण्याचा प्रयत्न करतात आणि अशा चुका करतात ज्यामुळे त्यांना इजा होऊ शकते. सर्वात मोठ्या चुकांपैकी एक म्हणजे कान साफ करण्यासाठी कॉटन बड्स, हेअरपिन्स, चाव्या किंवा इतर टोकदार वस्तू वापरणे. या वस्तू अनेकदा कानातील मळ काढण्याऐवजी तो कानात अधिक खोलवर ढकलतात. या परिस्थितीत, मेण अडकल्यामुळे, म्हणजेच कानलिकेत मेण अडकल्यामुळे, अडथळा निर्माण होऊ शकतो, ज्यामुळे वेदना, ऐकू कमी येणे आणि संसर्ग होऊ शकतो. कानात कोणतीही वस्तू घातल्याने काननलिकेच्या आतील त्वचेला इजा होऊ शकते आणि गंभीर परिस्थितीत कानाचा पडदा फाटू शकतो. जेव्हा कानातील मळ ही समस्या बनते, तेव्हा तो स्वतः काढण्याचा प्रयत्न करण्याऐवजी तज्ज्ञांची मदत घ्या.



### घरी कधीच कान साफ करू नयेत का?

नाही, तसे नाही. कानाच्या बाहेरील भागाला, ज्याला पिन्ना म्हणतात, अंघोळ करताना मऊ कापडाने स्वच्छ करता येते. हे फायदेशीर देखील आहे कारण यामुळे तिथे साचलेले धूळ आणि



घामाचे कण काढून टाकण्यास मदत होते, ज्यामुळे संसर्गाचा धोका कमी होतो. जोपर्यंत तुम्हाला काही अस्वस्थता जाणवत नाही, तोपर्यंत काननलिकेला स्पर्श न करण्याची शिफारस केली जाते. अशा परिस्थितीतही, डॉक्टरांना भेटणे उत्तम आहे जेणेकरून कानाला इजा न होता समस्येचे निराकरण केले जाऊ शकेल.

## स्वच्छता केव्हा आवश्यक आहे?

कानात थोड्या प्रमाणात मळ जमा होणे पूर्णपणे सामान्य आणि फायदेशीर आहे. या अवयवामध्ये एक नैसर्गिक यंत्रणा असते जी स्वतःहून कानातील मळ काढून टाकते. त्यामुळे, तो पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी जबरदस्ती करण्याची आवश्यकता नसते. तथापि, काही परिस्थितींमध्ये स्वच्छता करणे अत्यंत आवश्यक ठरते. खरे तर, जेव्हा कानातील मळ जास्त प्रमाणात जमा होतो, तेव्हा ती एक समस्या बनते. यामुळे कान बंद होऊ शकतो, ज्यामुळे ऐकू कमी येणे, अस्वस्थता, खाज सुटणे आणि कानात आवाज येणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

## तज्ज्ञांची मदत केव्हा आवश्यक आहे?

ज्या लोकांच्या कानात नैसर्गिकरित्या जास्त मळ तयार होतो, जे वारंवार इअरफोन किंवा श्रवणयंत्र वापरतात आणि ज्यांची काननलिका जन्मापासूनच अरूंद असते, अशा लोकांना कानात मळ साचण्याची आणि अडथळा निर्माण होण्याची शक्यता जास्त असते. अशा व्यक्तींनी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा आणि व्यावसायिक कान साफसफाई करून घ्यावी. कान स्वच्छ करण्याची ही सर्वोत्तम पद्धत आहे.

## व्यावसायिक साफसफाई कशी केली जाते?

» इअर ड्रॉप्सः एक औषधी द्रव मळ मऊ करण्याचे काम करतो, ज्यामुळे तो काढणे सोपे होते.

» इअर इरिगेशनः या पद्धतीमध्ये बल्ब सिरिंज किंवा इलेक्ट्रॉन इरिगेटर वापरून कानात कोमट पाणी, सलाईन किंवा एखादे द्रावण टाकले जाते. सतत प्रवाह कायम ठेवला जातो, ज्यामुळे साचलेला कानातील मळ सैल होऊन बाहेर पडतो.

» सक्शन : यामध्ये नियंत्रित व्हॅक्यूम प्रेशर वापरून कानातील मळ बाहेर खेचणाऱ्या सक्शन उपकरणाचा वापर केला जातो.

# राष्ट्रपतींच्या हस्ते पद्म पुरस्कार प्रदान; दिवंगत अभिनेते धर्मेंद्र, तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांचा गौरव

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)**–राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी सोमवारी देशातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १३१ मान्यवरांना पद्म पुरस्कारांनी सन्मानित केले. कला, साहित्य, विज्ञान, वैद्यकीय क्षेत्र, सामाजिक कार्य आणि क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेले पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले.



सोमवारी पाच जणांना पद्मविभूषण, १३ जणांना पद्मभूषण आणि ११३ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती के.टी. थॉमस, प्रसिद्ध व्हायोलिन वादक एन. राजम, साहित्य व शिक्षण क्षेत्रातील पी. नारायणन आणि केरळचे माजी मुख्यमंत्री व्ही.एस. अच्युतानंदन यांनाही पद्मविभूषण पुरस्कार देण्यात आला. पद्मभूषण पुरस्कार मिळवणाऱ्यांमध्ये गायिका अलका याज्ञिक, अभिनेते अभिनेते मम्मुटी, झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन, उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भगतसिंग कोश्यारी, उद्योगपती उदय कोटक, जाहिरात क्षेत्रातील पीयूष पांडे आणि माजी टेनिसपटू अमितराज यांचा समावेश आहे.

याशिवाय पद्मश्री पुरस्कारासाठी अभिनेता आर. माधवन, क्रिकेटपटू रोहित शर्मा, महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर, पॅरा–ॲथलीट प्रवीण कुमार, तमाशा कलावंत रघुवीर तुकाराम खेड़कर यांच्यासह विविध क्षेत्रांतील ११३ मान्यवरांची निवड करण्यात आली आहे.

**यांना मिळाला 'पद्मश्री' :** पद्मश्री पुरस्कार मिळवणाऱ्यांमध्ये ए. ई. मुथुनायगम, अनिल कुमार रस्तोगी, अशोक खाडे, अशोक कुमार सिंह, बलदेव सिंह, भगवानदास रायकरवार, बुद्धा रश्मि मणी, दीपिका रेड्डी, गफरुद्दीन मेवाती जोगी, हरमनप्रीत कौर भुल्लर, इंदरजीत सिंह सिद्धू, जनार्दन बापुराव बोथे, ज्योतिष देबनाथ, के. विजय कुमार, कुमार बोस, महेंद्र कुमार मिश्रा, मंगला कपूर, मोहन नागर, नारायण व्यास, नरेश चंद्र देव वर्मा, डॉ. पद्मा गुरमेट, प्रभाकर बसवप्रभु कोरे, प्रतीक शर्मा, प्रोसेनजीत चटर्जी, रोहित शर्मा, सविता पुनिया, शशी शेखर वेम्पती, श्रीरंग देवाबा लाड, सिवसंकरी, स्वामी ब्रह्मदेव महाराज, तरुण भट्टाचार्य, तृप्ती मुखर्जी आणि इतर अनेक मान्यवरांचा समावेश आहे.

# पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाकडून लातूर शहरात मटका अड्ड्यावर छापा

## ■अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेदरम्यान ५९ जणांविरुद्ध आणखी ३८ गुन्हे दाखल, ■ ५१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**लातूर (प्रतिनिधी)** – १ ते ३१ मे २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेच्या २५ व्या दिवशी पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या अधिपत्याखालील पथकाने लातूर शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत, शिवाजी महाराज चौकातून दयानंद कॉलेजकडे जाणाऱ्या रोडलगत मटका खेळविणाऱ्या व खेळणाऱ्या ११ जणांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याकडून रोख रक्कमेसह २,५७,४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमूद प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे जुगार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



काल दिवसभरात परिक्षेत्रात अवैध गुटखा विक्री करणाऱ्या ३ जणांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याकडून २७ लाख १ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. परिक्षेत्रात मटका–जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण ११ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ५५ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर अवैध दारू विक्री करणाऱ्या १६ इसमांविरुद्ध १६ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून २७ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचबरोबर, अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्ध २ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून १५ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैधरित्या गोवंश वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध ३ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ५ लाख ४२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाई सोबतच शस्त्र अधिनियमान्वये ३, कोटपा अन्वये ६ अशा एकूण ३८ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण ५० लाख ९७ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी, या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, सदर हेल्पलाईनला नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# माझ्या प्रत्येक यशामागे आई–वडिलांचे संस्कार, कष्टाची शिकवण –डॉ. ज्योती विनायकराव मेटे



**पुणे (प्रतिनिधी)** –मराठवाडा मित्र परिवार, पुणे आणि मराठवाडा बहुउद्देशीय प्रतिष्ठान आयोजित आदर्श माता – पिता पुरस्कार सोहळा पुणे येथील एमआयटी कॉलेज लोणी काळभोर येथे पार पडला.

यावेळी मराठवाडा मित्र परिवार आणि मराठवाडा बहुउद्देशीय प्रतिष्ठान यांच्या वतीने माझे आई–वडील सेवानिवृत्त कृषी अधिकारी आनंदराव लाठकर आणि सौ. जयश्रीताई लाठकर यांना सन २०२६ चा आदर्श माता–पिता पुरस्कार प्रदान करण्यात आला, हा क्षण माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि भावनिक आहे, असे प्रतिपादन श्रीमती डॉ. ज्योती मेटे यांनी केले.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, मी प्रशासन, समाजकारण आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात जे काही कार्य करू शकत आहे, त्यामागे त्यांच्या आयुष्यभराच्या त्यागाची, संस्कारांची आणि मूल्यांची मोठी ताकद आहे. प्रामाणिकपणा, समाजभान, संवेदनशीलता आणि संघर्षातून मार्ग काढण्याची शिकवण त्यांनीच दिली.

हा सन्मान केवळ माझ्या आई–वडिलांचा नसून प्रत्येक माता–पित्यांचा आहे, जे आपल्या मुलांना चांगले संस्कार देऊन समाजासाठी घडवतात, असेही त्या म्हणाल्या.

याप्रसंगी कार्यक्रमास श्रीमंत युवराज संभाजीराजे शाहू छत्रपती महाराज, ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, एम. आय. टी. ए. डी. टी. विद्यापीठ पुणेचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड, अप्पर पोलीस अधीक्षक, श्रीकांत डिसले, प्रा. डॉ. महेश थोरव, श्रीकांत शेळके, राष्ट्रीय उपाध्यक्ष, डिजिटल मीडिया ॲड. अमोल पाटील आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी लोकनेते विनायकराव मेटे यांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी बोलताना प्रत्येकाने स्व. मेटे यांच्या कार्यपद्धतीची आणि त्यांच्या जाण्याने निर्माण झालेल्या अपरिमित हानीबद्दल कटाक्षाने आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमानिमित्त एक मुलगी आणि पत्नी म्हणून मला अभिमान आणि आनंद मिळाला, असेही श्रीमती मेटे म्हणाल्या.

# सावंतवाडी रेल्वे स्थानकाला लोकनेते मधू दंडवते यांचं नाव देणार; मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय



**मुंबई(प्रतिनिधी)**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २६ मे रोजी राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार देखील उपस्थित होत्या. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ४ महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

सावंतवाडी रेल्वे स्थानकाला लोकनेते मधू दंडवते यांच नाव दिलं जाणार आहे. याबाबत आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात आला. मधू दंडवते यांचं कोकण रेल्वेसाठी योगदान पाहता त्यांच नाव देण्याची अनेक वर्षांची मागणी होती. अखेर आज मंत्रिमंडळ बैठकीसमोर परिवहन विभागाकडून याबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर राज्य सरकार हा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवणार आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत पेट्रोल आणि डिझेलच्या टंचाईबाबतही चर्चा झाली. काही जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलची अल्प प्रमाणात टंचाई असल्याबाबत बैठकीत चर्चा झाली.


## Change In Name

My Old Name is **SHUBHAM RAMESH PANDE** which now I am changing as New Name **SHUBHAM RAMESHRAO PANDE.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. **Address - R/o Flat No. 202 A Wing Prem Nagar, Jain Mandir Road Near Malegaon Road Taroda Bk. Nanded-431605**

## Change In Name

My Old Name is **Kailas Diliprao Desai** which now I am changing as New Name **Kailash Diliprao Desai.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**- Address -**
**At.Po. Chudawa,**
**Tq. Purna Dist. Parbhani**


# जम्मू काश्मीरमधील गुलमर्ग गोंडोला थांबल्याने ३०० पर्यटक संकटात

**गुलमर्ग (वृत्तसंस्था)** – गुलमर्ग गोंडोला या नावाने प्रसिद्ध असलेली गुलमर्गची केबल कारसेवा तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली आणि सुमारे ३०० पर्यटक संकटात सापडले. लष्कर, पोलीस आणि नागरी प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू केले आणि केबल कारमध्ये अडकलेल्यांची सुटका केली.

गुलमर्गची केबल कार सेवा तांत्रिक बिघाडामुळे अचानक बंद पडली. केबल कार बंद झाली त्यावेळी अनेक केबिन या केबलच्या आधाराने पुढे सरकत होत्या. या केबिन जागीच थांबल्या आणि सुमारे ३०० पर्यटक अडकले. भारतीय लष्कराच्या नऊ राजपुताना रायफल्स, जम्मू आणि काश्मीर पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने घटनेची माहिती मिळताच तातडीने मदतकार्य केले. आवश्यक ते खबरदारीचे आणि सुरक्षेचे उपाय करून केबिनमध्ये अडकलेल्यांची टप्प्याटप्प्याने सुटका करण्यात आली. तांगमार्गचे उपविभागीय दंडाधिकारी आणि तहसीलदार यांचे देखरेखीत मदतकार्य करण्यात आले.

गोंडोला अर्थात केबल कार अनपेक्षितपणे थांबली. यामुळे महिला, मुले, ज्येष्ठ नागरिक असे अनेक पर्यटक घाबरले. लष्कर, पोलीस आणि नागरी प्रशासनाने केबिनमध्ये अडकलेल्यांची टप्प्याटप्प्याने सुटका केली.

# अशोक खरातनंतर आणखी एका भोंदूबाबाचा पर्दाफाश

**मुंबई (प्रतिनिधी)** – नाशिकचे भोंदू अशोक खरात प्रकरण हे देशभर चर्चेत आहे. महिलांवरील लैंगिक अत्याचार, भाविकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत आर्थिक फसवणूक अशा विविध गुन्ह्यांमध्ये भोंदू खरातच्या न्यायालयीन कोठडी, पोलीस कोठडी अशा वाऱ्या चालू आहेत. दरम्यान नाशिकमध्ये आणखी भोंदूबाबा समोर आला असून, या भोंदूबाबाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

नाशिकच्या इंदिरानगर पोलीस ठाण्यात आश्रम आणि मठ स्थापन करून, विविध समस्यांनी त्रस्त असलेल्या लोकांचे शोषण करणाऱ्या कमलेश शिवकुमार अधिकारी आणि त्याच्या पत्नीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या प्रयत्नांनंतर हा प्रकार उघडकीस आला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील लऊळ येथील मदन देवकर आणि ज्ञानेश्वर देवकर या दोन पीडित भावांच्या आई–वडिलांचे २०२१ मध्ये अवघ्या एका महिन्याच्या अंतराने निधन झाले होते. आई वडिलांच्या अचानक झालेल्या निधनामुळे दोन्ही भाऊ मानसिक तणावाखाली होते. जो सोबतच




एकाच अचानक घडलेल्या घटनेनं भीतीच्या छायेत होते. यावर काहीतरी आध्यात्मिक किंवा दैवी तोडगा मिळावा म्हणून त्यांनी शोध सुरू केला. यादरम्यान त्यांना यूट्यूबवर नाशिकच्या पाथर्डी फाटा येथील भोंदूबाबा कमलेश अधिकारी याची माहिती मिळाली.

दोन्ही भावांनी नाशिक गाठून कमलेश अधिकारीची भेट घेतली. तणावाखाली असलेल्या दोन्ही भावांच्या भोळेपणाचा आणि भीतीचा फायदा घेत भोंदूबाबानं त्यांच्या मनाचा ताबा मिळवला. तुमच्या कुटुंबाचे मागच्या जन्मीचे पाप आहे, तुम्ही राहत असलेल्या जमिनीत दैवी दोष आहे. तिथे गुप्तधनाचा साठा असून अतृप्त आत्म्यांनीच तुमच्या आई–वडिलांचा बळी घेतला आहे. आता तुम्हा दोघांवरही मृत्यूयोग आहे, अशी भीती देवकर बंधूंना त्याने दाखवली.

यानंतर भोंदूबाबानं त्यांना मध्यप्रदेशातील उज्जैन येथे बोलावून घेतले. तिथल्या स्मशानभूमीत जळत्या चितेवर चार दिवस अघोरी पूजा करण्यात आली. या पूजेदरम्यान पशूंचा बळी देण्यात आला आणि या नावाखाली १ लाख ५० हजार रुपये उकळले. त्यानंतर नांदगाव तालुक्यातील पिंपळखेड येथील आश्रमात पुन्हा अघोरी पूजा करून प्राण्यांचा बळी देण्यात आला आणि पीडितांना दारू प्रसाद म्हणून देण्यात आली.

एवढ्यावरच न थांबता या भोंदूबाबानं दोन्ही भावांना त्र्यंबकेश्वर येथील आश्रमात बळजबरीने डांबून ठेवले. त्यांच्याकडून घरगुती कामे करून घेत त्यांचे विविध प्रकारे शोषण केले. तसेच स्वतःचा मठ बांधण्याच्या बहाण्याने त्यांची दोन एकर शेतजमीन फसवणूक करून परस्पर स्वतःच्या नावावर करून घेतली. या संपूर्ण गुन्ह्यात भोंदूबाबा कमलेश अधिकारी याला त्याची पत्नी देखील मदत करत असल्याचे निष्पन्न झाले आहे.


## जाहीर प्रगटन

मौजे नांदेड ता. जि. नांदेड मनपा हद्दीतील सर्व्हे नं. १६५, सीसन. १२८१५ पैकी एक प्लॉट ज्याचा प्लॉट नं. ७२ आहे. मनपा मालमत्ता क्र. ९-६-३३१ व मनपा पीन क्र. ४०३०९०४६४० असा आहे. ज्यावर इम्रान टावर नामे इमारत बांधलेली आहे. त्यामधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. एफ–३ आहे. जो रहिवासी उपयोगाचा असून, ज्याचे एकूण क्षेत्रफळ ५९० चौरस फुट म्हणजेच ५४.८३ चौरस मीटर आहे. सदर फ्लॅट अमजद खान जमीर खान पठाण रा. फ्लॅट नं. एफ –३ इम्रान टॉवर देगलूर नाका नांदेड यांचेकडून अमेरोद्दीन अशरफोद्दीन फारूखी रा. स्नेहनगर पोलीस वसाहत नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉट नं. ७२ ची चतुःसिमा–** पूर्वेस –असगरभाई यांचे घर, पश्चिमेस –जाकेरभाई यांचे घर, दक्षिणेस –रोड, उत्तरेस –महंमद ताज यांचे घर. **फ्लॅट नं. एफ–३ ची चतुःसिमा–** पूर्वेस–असगरभाई यांचे घर, पश्चिमेस–फ्लॅट नं. एफ–२, दक्षिणेस–रोड, उत्तरेस–सामाईक पायऱ्या लिफ्ट व पॅसेज आहे.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील फ्लॅटबद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर फ्लॅटचे खरेदीखत आमेरोद्दीन अशरफोद्दीन फारुकी यांच्या नावे करून घेण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**आमेरोद्दीन अशरफोद्दीन फारुखी रा. स्नेहनगर, पोलीस वसाहत, नांदेड मो.९७६६०७५००७**

## जाहीर प्रगटन
**(जन्म नोंद आदेशासाठी)**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार निशात फातेमा शेख अहेमद पाशा वय ३० रा. पिरबुऱ्हाणनगर, नांदेड ता. जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरिता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव अर्जदार निशात फातेमा शेख अहेमद पाशा वय ३० रा. पिरबुऱ्हाणनगर, नांदेड ता. जि. नांदेड या सदर व्यक्तीचा राहते घर पिरबुऱ्हाणनगर, नांदेड ता. जि. नांदेड ठिकाणी दिनांक १७.०८.१९९६ या दिवशी जन्म झाला असून, जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक ०६.०५.२०२६ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज पुराव्यासह सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसिलदार नांदेड तथा
तालुका दंडाधिकारी नांदेड करिता

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार प्रेमला वैजनाथ दासरवार वय ५९ रा. विणकर कॉलनी, चौफाळा, नांदेड ता. जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे आईचे मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

मृत्यु झालेल्याचे नाव कलावती लिंगम नागुल रा. विणकर कॉलनी, चौफाळा, नांदेड ता. जि. नांदेड सदर व्यक्तीचा राहते घर विणकर कॉलनी, चौफाळा, नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक ११.०५.२००७ या दिवशी मृत्यु झाला असून मृत्यु प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात अर्जदार यांनी दिनांक ०६.०४.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील मृत्यु दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसीलदार नांदेड करिता

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार प्रेमला वैजनाथ दासरवार वय ५९ रा. विणकर कॉलनी, चौफाळा, नांदेड ता. जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे वडीलाचे मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

मृत्यु झालेल्याचे नाव लिंगम रामजी नागुल रा. विणकर कॉलनी, चौफाळा, नांदेड ता. जि. नांदेड सदर व्यक्तीचा राहते घर विणकर कॉलनी, चौफाळा, नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक ०५.१०.१९७२ या दिवशी मृत्यू झाला असून मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात अर्जदार यांनी दिनांक ०६.०४.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसीलदार नांदेड करिता

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेचरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# अनधिकृत जाहिरात होर्डींगवर महापालिकेची कारवाई

## शिवाजीनगर झोनमध्ये दोन गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– मनपा हद्दीत लावण्यात आलेल्या अनधिकृत जाहिरात होर्डिंगवर महानगरपालिका प्रशासनाने कारवाई केली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर झोनमध्ये दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शहरातील मध्यवर्ती बाजारपेठ असलेल्या शिवाजीनगर झोन अंतर्गत महानगरपालिकेतर्फे अनधिकृत जाहिरात होर्डींग्जवर धडक कारवाई करून मोर चौक येथे अनधिकृत बॅनर लावणारे राजू रामराव मोतेवार, सोमेश राजू मोतेवार, क्षितीज राजू मोतेवार यांच्यासह बॅनर तयार करणारे व लावणाऱ्या अज्ञात व्यक्तींविरुद्ध त्याचप्रमाणे काबरानगर रिंग रोडवर अनधिकृत बॅनर लावणाऱ्या व्यक्ती विरुद्धसुध्दा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महानगरपालिकेने मनपा हद्दीमध्ये जाहिरात फलक लावण्यासाठी एकुण ११८ ठिकाणे निश्चित केले असुन सदरील ठिकाणी जाहीरात फलकांच्या फ्रेम लावण्यात आलेल्या असुन त्या फ्रेमची साईज सुध्दा निश्चित करण्यात आलेली आहे. ज्यामध्ये महानगरपालिकेने निर्धारीत केलेले शुल्क भरुन नागरीकांना / स्वंयसेवी संस्थांना तात्पुरती जाहिरात लावता येते. परंतु शहरातील खाजगी बिल्डर यांच्यासह बॅनर तयार करणारे व लावणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुध्द विनापरवानगी जाहिरात फलक लावण्यात आल्याचे दिनांक २६ मे रोजी निर्दशनास आल्याने महाराष्ट्र विरुपन प्रतिबंधक कायदा १९९५ चे कलम ३ चे उल्लंघन केल्यामुळे संबंधीत व्यक्ती विरुध्द भाग्यनगर पोलीस स्टेशन येथे महानगरपालिके तर्फे फिर्यादि क्र. ०२८०/२०२६ आणि फिर्यादि क्र. ०२७८/२०२६ दिनांक २६ मे रोजी नोंदविण्यात आली आहे.





सदरील कारवाई आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशाने अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम व उपआयुक्त स.अजितपालसिंघ संधु यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी नगर क्षेत्रिय कार्यालयाचे क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, इमारत निरीक्षक भरत शिवपुरे, अतिक्रमण पथक प्रमुख दत्ता कल्याणकर व त्यांच्या अतिक्रमण पथकाने पार पाडली आहे. शहरातील नागरीकांनी व व्यापारी वर्गाने महापालिकेने निश्चित केलेल्या अधिकृत स्थळावर परवानगी घेऊन होर्डींग्स लावावेत त्याचप्रमाणे अनधिकृत जाहिरात फलक लावुन शहर विद्रुपीकरण न करता महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दरम्यान रस्त्याच्या बाजूने नाली करण्यास बी अँड सी उदासीन

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दरम्यान झालेल्या रस्त्याच्या कामानंतर दोन्ही बाजूने नाली केली नाही. या प्रकारामुळे या भागात दुर्गंधी पसरली आहे. विशेष म्हणजे हा रस्ता शहरातील मुख्य रस्ता म्हणून ओळखला जातो. हुजूर साहेब रेल्वेस्थानकावर आलेला प्रत्येक माणूस याच रस्त्याने शहरात प्रवेश करतो. त्यांना मात्र या अर्धवट कामाचा त्रास सहन करावा लागतो. पाठपुरावा करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग या कामासाठी उदासीन असल्याचे दिसून येत आहे.

रेल्वे स्टेशन, जीएसटी ऑफिस ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंतच्या दोन्ही बाजूच्या नालीचे काम करण्यात आले नाही.

डॉ. आंबेडकर पुतळा जीएसटी ऑफिस ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या रस्त्यावरील नालीचे काम बऱ्याच दिवसांपासून रखडलेले आहे. या नालीमध्ये पाणी वाहून जाण्यासाठी मार्ग नसल्यामुळे तसेच सदर नालीस घुस लागली आहे. सीसी रोडचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु नालीचे काम अद्यापपर्यंत झालेले नाही, त्यामुळे या परिसरातील नागरिकांना या घाण पाण्याचा वारंवार त्रास होत आहे. ज्या दिवशी महापालिकेच्या नळाला पाणी आले त्या दिवशी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पाणी येत असते. त्याचा त्रास रस्त्यावरून ये-जा करणा-या भाविक/ नागरिकांना होत आहे. याच रस्त्यावर धार्मिक स्थळ सुध्दा आहेत. त्याही भक्तांना या घाण पाण्याचा त्रास होत आहे.

जीएसटी ऑफिस ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या दोन्ही बाजूच्या नालीचे काम तत्काळ हाती घेवून काम पूर्ण करुन घ्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते वसीम बाबू कासिम उस्मान शेठ यांनी महानगरपालिकेकडे केली आहे. महानगरपालिकेने या कामासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र दिले आहे. पावसाळ्यापूर्वी जर ही कामे मार्गी लागली तर या भागातील नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी महानगरपालिकेने व बी अँड सी.ने घेणे गरजेची असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# पुणे विभागातील दुहेरीकरण कामामुळे काही गाड्यांच्या मार्गात बदल

**नांदेड (प्रतिनिधी)**– मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील विसापूर, रांजणगाव, सरोळा या दरम्यान दुहेरीकरण प्रकल्पांतर्गत प्री-नॉन इंटरलॉकिंग व नॉन इंटरलॉकिंग काम हाती घेण्यात येणार आहे. या कामामुळे काही रेल्वे गाड्यांच्या मार्गात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

यानुसार खालील गाड्या परिवर्तित मार्गाने धावणार आहेत: गाडी क्रमांक १२६२७ एसबीसी नवी दिल्ली एक्सप्रेस दिनांक २७ मे २०२६ रोजी सोलापूर, कुर्डुवाडी, लातूर रोड, परभणी, मनमाड मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११४१० निजामाबाद, पुणे एक्सप्रेस दिनांक २७ मे २०२६ रोजी परभणी, लातूर रोड, कुर्डुवाडी, दौंड मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस दि. २८ मे २०२६ रोजी कुर्डुवाडी, लातूर रोड, परभणी मार्गे धावेल. गाडी क्रमांक १७६२९ हडपसर, नांदेड एक्सप्रेस दिनांक २८ मे २०२६ रोजी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड- परभणी मार्गे धावेल. गाडी क्रमांक १७६३० नांदेड, हडपसर एक्सप्रेस दिनांक २८ मे २०२६ रोजी परभणी, लातूर रोड, कुर्डुवाडी, दौंड मार्गे धावेल. गाडी क्रमांक १७६२९ हडपसर, नांदेड एक्सप्रेस दिनांक २९ मे २०२६ रोजी दौंड, कुर्डुवाडी, लातूर रोड, परभणी मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११०२६ अमरावती, पुणे एक्सप्रेस दिनांक २८ मे २०२६ रोजी अकोला, पूर्णा, परभणी, लातूर रोड, कुर्डुवाडी, दौंड मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११०२५ पुणे, अमरावती एक्सप्रेस दिनांक २९ मे २०२६ रोजी दौंड, कुर्डुवाडी, लातूर रोड, परभणी, पूर्णा, अकोला मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस दि. २८ मे २०२६ रोजी परभणी, लातूर रोड, कुर्डुवाडी, दौंड मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११४०९ दौंड, निजामाबाद एक्सप्रेस दिनांक २९ मे २०२६ रोजी कुर्डुवाडी, लातूर रोड, परभणी मार्गे धावेल. गाडी क्रमांक १७६३० नांदेड, हडपसर एक्सप्रेस दिनांक २९ मे २०२६ रोजी परभणी, लातूर रोड, कुर्डुवाडी, दौंड मार्गे धावेल. गाडी क्रमांक १२६२७ एसबीसी नवी दिल्ली एक्सप्रेस दिनांक २९ मे २०२६ रोजी सोलापूर, कुर्डुवाडी, लातूर रोड, परभणी, मनमाड मार्गे धावेल. गाडी क्रमांक २०६५७ हुबळी, निजामुद्दीन एक्सप्रेस दिनांक २९ मे २०२६ रोजी सोलापूर, कुर्डुवाडी, लातूर रोड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, मनमाड मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११४१० निजामाबाद, पुणे एक्सप्रेस दिनांक २९ मे २०२६ रोजी परभणीलातूर रोडकुर्डुवाडीदौंड मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११४०९ दौंडनिजामाबाद एक्सप्रेस दिनांक ३० मे २०२६ रोजी कुर्डुवाडीलातूर रोडपरभणी मार्गे धावेल, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

# श्रीकृष्ण कोकाटे नांदेड एसीबीचे पोलीस अधीक्षक

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्यातील काही भापोसे व रापोसे अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. या बदल्यांमध्ये नांदेडचे तत्कालीन पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात नियुक्ती करण्यात आली आहे. तर संदीप पालवे यांना लोहमार्ग छत्रपती संभाजीनगरची जबाबदारी देण्यात आली आहे.



श्रीकृष्ण कोकाटे यांनी नांदेडमध्ये गुन्हेगारीवर चांगले नियंत्रण मिळविले होते. विशेष म्हणजे बीट हवालदारांसाठी क्यूआर कोड हा त्यांनी सुरू केलेला उपक्रम अजूनही नांदेड पोलिसांना फायद्याचा ठरत आहे. यानंतर त्यांची बदली हिंगोली येथेही झाल्यानंतर हिंगोलीत त्यांनी चांगला जम बसविला होता, परंतु विधानसभा निवडणुकीच्या काळात त्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. तेव्हापासून ते बदलीच्या प्रतीक्षाधीन होते. अखेर मंगळवारी राज्यातील काही भापोसे आणि रापोसे अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्या बदल्यांमध्ये श्रीकृष्ण कोकाटे यांच्यावर नांदेड येथील एसीबी विभागाच्या पोलीस अधीक्षक पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. या विभागांतर्गत लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली या चार जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र येते. नांदेड येथे कार्यरत असलेले एसीबीचे पोलीस अधीक्षक संदीप पालवे यांना लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात आले आहे.

# युवक काँग्रेसचे मुदखेड पेट्रोलपंपावर आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)** –मागील काही दिवसांपासून डिझेलचा मोठा तुटवडा जाणवत आहे. यामुळे सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. या पार्श्वभूमीवर आक्रमक झालेल्या युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी मुदखेड येथील पेट्रोल पंपावर 'मेलोडी खाओ, डिझेल भूल जाओ' असे अनोखे आंदोलन केले.

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून शहरासह ग्रामीण भागातील अनेक पेट्रोल पंपावर डिझेलचा तुटवडा भासत आहे. यात काहीजण डिझेलची साठेबाजी करत असल्याचा आरोपही होत आहे. तर ज्या ठिकाणी डिझेल आहे, तेथे लांबच लांब रांगा लागत आहेत. तर वाद-विवाद आणि हाणामारीच्या घटनाही सुरू झाल्या आहेत. प्रशासनाकडून इंधनाचा कोणताही तुटवडा नाही असा दावा केला जात आहे. परंतु हा दावा फोल ठरत आहे, यामुळे सर्वसामान्यांचा संताप अनावर झाला आहे. तर डिझेल तुटवड्यानंतर शेतकरी, सामान्यांसह युवक काँग्रेस आक्रमक झाली आहे.

नांदेड जिल्ह्यातील मुदखेड येथील पंपावर डिझेल घेण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांना काँग्रेसकडून मेलोडी चॉकलेटचे वाटप करून मंगळवारी हे अनोखे आंदोलन करण्यात आले. मेलोडी खाओ डिझेल भूल जाओ, अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

मेलोडी चॉकलेट वाटप करून युवक काँग्रेसने केंद्र सरकारचा निषेध केला. देशात इंधन टंचाई निर्माण असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी इटलीच्या पंतप्रधानांना मेलोडी चॉकलेट देऊन भारतीयांचा अपमान करत असल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला. डिझेलचा तुटवडा सुरळीत न झाल्यास येत्या दोन तारखेला युवक काँग्रेसच्या वतीने मुदखेड तहसीलवर शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्याचा इशारा युवक काँग्रेस प्रदेश प्रवक्ते बालाजी गाडे पाटील यांनी यावेळी दिला.

या अनोख्या आंदोलनात कार्यकर्ते, पदाधिकारी आणि शेतकरीसुद्धा सहभागी झाले होते.

# नांदेडच्या श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियमच्या आधुनिकीकरणासाठी ४०० कोटींच्या प्रकल्पास मंजुरी द्या –खा. डॉ. अजित गोपछडे

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी स्टेडियमच्या क्षमता विस्तार व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज आधुनिकीकरणासाठी ४०० कोटींचा निधी मंजूर करावा, अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांची भेट घेऊन केली आहे.

क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांना दिलेल्या निवेदनात खा. डॉ. अजित गोपछडे यांनी म्हटले की, नांदेड ही श्री गुरु गोविंद सिंघजींच्या पावन स्मृतींनी समृद्ध नगरी आहे. येथे क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी आधुनिक स्टेडियमची आवश्यकता आहे. यापूर्वी केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने ४० कोटी रुपयांच्या प्रस्तावास मान्यता दिली होती. ते काम आता पूर्ण झाले असून, नांदेड-वाघाळा शहर



महानगरपालिकेमार्फत स्टेडियमच्या आधुनिकीकरण व पुनर्बांधणीचा सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासोबतच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करण्यासही मदत होणार आहे.

सुधारित प्रकल्प अहवालानुसार सुमारे ४०० कोटी रुपयांचा वाढीव खर्च अपेक्षित असून, यात मुख्य स्टेडियम इमारत, प्रेक्षक गॅलरी, क्रीडा सुविधा, आधुनिक प्रकाश व्यवस्था, सुरक्षा सुविधा, प्रशासकीय विभाग, पार्किंग तसेच इतर अत्याधुनिक सुविधा उभारण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. हा निधी मंजूर झाल्यास स्टेडियमचे काम अत्याधुनिक पद्धतीने पूर्ण केले जाईल ज्यामुळे नांदेड जिल्ह्यात क्रीडा क्षेत्राला मोठी भरभराटी येईल. शिवाय महाराष्ट्रासह देशातील महत्त्वाचे खेळही या ठिकाणी खेळविले जातील. ज्यातून नांदेडचा आर्थिक विकास साधता येईल, असा विश्वास खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केला.

# परीक्षा केंद्र परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा नांदेड शहरात रविवार, दि. ३१ मे २०२६ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत १८ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहेत. या परीक्षा केंद्राच्या परिसरात बाहेरील व्यक्तींचा उपद्रव होऊ नये तसेच परीक्षा निर्भय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम १६३ नुसार ३१ मे रोजी परीक्षा केंद्र परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे.

या आदेशानुसार परीक्षा केंद्रापासून ५०० मीटरच्या परिसरात रविवार, दि. ३१ मे रोजी सकाळी ८ ते रात्री ७ वाजेपर्यंत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवेश करता येणार नाही. परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेले अधिकारी-कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इत्यादी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या ५०० मिटरपर्यंत परिसरात वापरण्यास, जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आदेशाद्वारे प्रतिबंध केले आहे.

# आंबेडकरवादी मिशनच्या ग्रंथदान सोहळ्यास प्रतिसाद



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– येथील आंबेडकरवादी मिशनमध्ये ग्रंथदान सोहळा पार पडला. या ग्रंथदान सोहळ्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित ग्रंथदान सोहळ्याला मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, मुद्रांक शुल्कचे पूर्व जिल्हाधिकारी वसंतराव सातदिवे, पूर्व सनदी अधिकारी एकनाथ मोरे, कोषागार अधिकारी उत्तम सोनकांबळे, मुख्याधिकारी निलम कांबळे, शिवाजी सोनकांबळे, रेणुका तम्म्मलवार सहआयुक्त हर्षद रावीकर, सहा. आयुक्त, स्वप्नाली धुतराज, सहा. पोलीस निरीक्षक कपिल बुद्धेवार, प्रा. विनोद काळे, प्रा. हनुमंत भोपळे, जी. सिद्धार्थ, मधुकर गायकवाड, विठ्ठल गायकवाड, भारत शिंदे, ॲड. खंडाळीकर, प्रा. इरवंत, उद्योजक प्रदीप वाघमारे, कपिल भद्रे, जयपाल वाघमारे, जयवर्धन भोसीकर, संघमित्रा सोनकांबळे, अर्चना कांबळे, करुणा तारू, डॉ. विकास कांबळे, श्रीकांत मगर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कामाजी पवार यांनी एक लाख रुपयांचे ग्रंथ आंबेडकरवादी मिशनले प्रदान केले. आंबेडकरवादी मिशनच्या वतीने पुढील वर्षात दहा लाख रुपयांचे यूपीएससीसाठीचे ग्रंथ राज्यातील विविध समाजातील संस्थांना देण्यात येतील, असे दीपक कदम यांनी जाहीर केले. याशिवाय हे वर्ष महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष शिक्षण क्रांती वर्ष म्हणून साजरे करण्यात येईल. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शिक्षण क्रांतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाला भंते महाविरो थेरो, भंते पय्याबोधी थेरो, भंते शिलरत्न थेरो, भंते सुभूती, भंते गगन, भंते पत्तीसेन, भंते बोधिधम्मो, आर्या चारुशीला आदी मान्यवर भंते आणि श्रमणेर संघ उपस्थित होता.

# पिस्तूल बाळणारे तिघेजण एलसीबीच्या जाळ्यात; वजिराबाद व विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या वजिराबादसह आदी परिसरात पिस्तूलचा धाक दाखवून दहशत पसरवणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने तर विमानतळ ठाण्याच्या हद्दीत एकाला दुसऱ्या पथकाने अटक केली. त्यांच्याकडून दोन पिस्तूल आणि चार जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहेत. त्या दोघांविरुद्ध वजिराबाद तर एकाविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

जिल्ह्यातील गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन क्रेकडाऊन अभियान सुरू केले आहे. या अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल



भोसले यांनी खंडणी विरोधी पथकाचे सपोनि विठ्ठल घोगरे आणि पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना गोपनीय माहिती काढून अवैध अग्नीशस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. दि. २५ मे २०२६ रोजी शहरातील गस्त दरम्यान सपोनि विठ्ठल घोगरे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेजच्या बाजूस बंदाघाट रोडवर एक तरुण गावठी पिस्तूल बाळगुन असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने मिळालेल्या माहितीप्रमाणे एनएसबी. कॉलेजच्या बाजूस बंदाघाट रोड, नांदेड येथे छापा कार्यवाही केली. यावेळी हरप्रितसिंघ ऊर्फ हॅप्पी महेंद्रसिंघ सुनकेवार (वय ४१ वर्षे, रा. पांचाली हॉटेल जवळ, गुरूव्दारा चौरस्ता, नांदेड) हा मिळून आला. त्यास ताब्यात घेवून त्याच्या ताब्यातून विनापरवाना बेकायदेशीररित्या बाळगलेले एक लोखंडी गावठी पिस्तूल (अग्नीशस्त्र) व चार जिवंत काडतूस असा एकूण २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची गावठी पिस्तूल व काडतूस कोठून आणले याबाबत विचारपूस केली असता त्याने अग्निशस्त्र व काडतुस हे तेजिंदरपालसिंघ ऊर्फ सोनू भागसिंघ लदड (वय २८ वर्षे, रा. गजानन महाराज मंदिराजवळ, मालेगाव रोड नांदेड) याच्याकडून विकत घेतल्याचे सांगितल्याने त्यास पण ताब्यात घेण्यात आले. दोन्ही आरोपीतांना मुद्देमालासह वजिराबाद पोलीस ठाण्यात हजर करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच दुसऱ्या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड हे आपल्या पथकासह विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत मालटेकडी गुरुद्वारा ब्रिजखाली गस्तीवर असताना त्यांनीही शेख सुलेमान शेख पप्पू धार शेख जिलानी (वय २३ रा.देगलूर नाका) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडूनही एक पिस्तूल जप्त करून पिस्तूलसह त्याला विमानतळ पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. त्याच्याविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com